१०८४

# भावलहरी.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ४१०८

REFBK-0004496
REFBK-0004496

वा. भा. दामले.

सं.ग्रंथ नं. २०४५
नोंद नं. ६६५०

संदर्भ ग्र. ४०८८
३१।३।३८

[ राजस्थान मराठी प्रकाशन विभाग-२ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६५८७
ठाणे

# भावलहरी

अर्थात्

# भावमुग्धेचा वऱ्हाडी सोहळा

(काव्य)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
४८९५

कवि-वासुदेव भास्कर दामले,
बी. ए.; एल्‌एल्‌. बी. वकील, अकोला.

REFBK-0004496
REFBK-0004496

---

मुद्रक व प्रकाशक
दत्तात्रय सदाशिव अभ
राजस्थान प्रिंटिंग अँड लिथो वर्क्स लि० अकोला.

---

[प्रथमावृत्तीचे हक्क प्रकाशकांनें आपणाकडे ठेवले आहेत.]

---

प्रथमावृत्ति ] किंमत १ रुपया [ प्रति १०००

सन १९३१

# ❀ प्रस्तावना ❀

वऱ्हाडांतील एक उदयोन्मुख व उत्कट राष्ट्रीय वृत्तीचे कवि या नात्यानें आमचे कवि-मित्र रा० रा० वासुदेव भास्कर दामले ( आकोला येथील वकील ) हे काव्यरसिक महाराष्ट्रजनतेस या पूर्वींच चांगले परिचित झालेले आहेत. गेल्या २।४ वर्षांच्या अल्पावधींत, त्यांनीं ' शिवशाहिर ' व ' स्वातंत्र्य समर ' या नांवाचीं दोन, पोवाडे वजा, सुंदर व स्वदेशाभिमानपूर्ण ऐतिहासिक लघु काव्यें महाराष्ट्रजनतेस सादर केलेलीं पुष्कळांच्या अवलोकनांत आलीं असतीलच. सहजोंघी व जोरदार भाषासरणी, प्रसन्न व रम्य कल्पना आणि प्रसंगानुसार, **उदात्त राजनिष्ठा** व **स्वराज्य निष्ठा** यांच्या मधुर मिश्रणानें बनलेलें उत्कट राष्ट्रीयवृत्तिपूर्ण व स्वदेशाभिमान-स्फूर्तिसंचारक-विचारप्रदर्शन या, खऱ्या ऐतिहासिक काव्याच्या सारभूत व जीवन सर्वस्व असणाऱ्या गुणत्रिपुटीचें वरील दोन्ही काव्यांत फार आल्हाददायक व परिणामकारक असें प्रतिबिंब पडलें असल्यामुळें, तीं काव्यें साधारण जनतेच्या सकौतुक गौरवास व सक्रिय उदार आश्रयास पात्र झालीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

प्रस्तुत 'भाव-लहरी' या त्यांच्या अभिनव कवितासंग्रहद्वारा, रा० रा० दामले यांच्या अंगच्या उज्वल काव्यशक्तीचा अधिक व्यापक, रम्य, विविधतापूर्ण, ललित कोमल व उदात्त गंभीर असा गुणाविष्कार दृग्गोचर झालेला पाहून खऱ्या सहृदय व गुणग्राही रसिकांस निरतिशय आनंद वाटेल अशी माझी खात्री आहे; आणि या माझ्या खात्रीला, सर्व महाराष्ट्रास प्रिय व आदरणीय अशा दोन सत्कविवर्यांच्या अधिकारयुक्त अभिप्रायरूपी ' ग्वाही ' ची ही पुष्टि मिळत आहे ही अत्यंत संतोषाची गोष्ट आहे, यांत शंका नाहीं. त्यायोगानें प्रस्तावनेचें माझें कार्य सुलभ झालें आहे.

रा० दामले यांचा हा रम्य काव्य गुणाविष्कार केवळ ५।७ वर्षांच्याच काव्यरचनाव्यासंगाच्या परिश्रमाचें फल आहे. ही गोष्ट येथें नमूद केली असतां ती त्यांच्या कवित्वशक्तीच्या उज्वलतेची एक कौतुकास्पद साक्ष होईल असें मला वाटतें. गद्यात्मक रचनेचा व्यासंग असो वा पद्यात्मक रचनेचा व्यासंग असो., ग्रंथकर्त्याच्या किंवा कवीच्या रचनेस लवकर, उशीरा, कांहीं एका ठरीव शैलीचें स्वरूप येणें ही लेखन व्यवसायाची परिगणति, व त्याच्या

खऱ्या चांगलेपणाची एक महत्वाची कसोटी होय. कित्येक लेखक किंवा कवि किती तरी वर्षे अनेकविध व अविश्रांत 'लेखनकर्म' किंवा 'कविकर्म' करीत असतांही, त्यांच्या लेखनास, किंवा काव्यास वैशिष्ट्यदर्शक असें कांहींच स्थायी स्वरूप अथवा ' ओज ' कसें तें प्राप्तच होत नाहीं ! कित्येकांच्या लेखनास किंवा काव्य व्यासंगास सतत अभ्यासानें एक प्रकाराच्या निरलस तपाचरणामुळें झणू या पाहिजे तर 'क्रमशः पण कांहीं ठरीव मुदतींत निश्चित असें **ओज**, किंवा **कळा** ह्मणजेच **वैशिष्ट्य**, येतेंच येतें ? त्या मानानें, रा० दामले यांच्या कवितेंत त्यांचे वैशिष्ट्यदर्शक असें पुष्कळ गुण अल्प कालांत कायमचे समाविष्ट होऊन ते त्यांच्या काव्यरचनेला **उज्वल काव्यमयता** आणि **उत्कट राष्ट्रीयत्वाची वृत्ति** यांच्या मधुर मिलनानें अधिक कमनीय-**मोहक** व **उदात्त-गंभीर** अशा शैलीचें स्वरूप देण्यास कारणीभूत झाले आहेत, ही रा० दामले यांस खरोखर फार भूषणावह गोष्ट असून, माझ्यासारख्या आप्तसदृश निरीक्षकास ती सकौतुक अभिमानाची वाटल्यास त्यांत नवल नाहीं !

प्रस्तुत 'भावलहरींत' एकंदर ५६ कविता असून, त्यांचें सहा विभागांत वर्गीकरण करण्यांत आलेलें वाचकांस अनुक्रमणिकेवरून दिसून येईलच. तसेंच हें वर्गीकरण तार्किक सूक्ष्मतेचें किंवा अगदीं कांटेतोल बारकाईनें केलेलें नसून, सामान्यतः 'गीतक' वजा [Lyrical] ज्याप्रमाणें काव्यरचनेचें ठोकळ वर्गीकरण करण्याचा प्रघात आहे त्यास अनुसरूनच हें वर्गीकरण केलें आहे. ही गोष्ट ही, कोणत्याही १।२ वर्गाखालील कांहीं कवितांचे तुलनात्मक निरीक्षण केलें असतां कोणासही सहज कळून येणारी आहे. विषयाच्या गांभीर्यानुरूप प्रौढ व भारदस्त शब्दरचना आणि विषयाच्या अनुषंगानें स्फुरणारे व्यापक, भव्य व तत्व-चिंतनात्मक विचार-तरंग यांचा सहज-रम्य संयोग मुख्यतः "वंदनपर" व "देशभक्तिपर" या विभागांतील कांहीं कवितांत उत्कटपणें दिसून येतो. उदाहरणार्थ, 'श्रीगणेशाष्टकांचें दोन नमुने व दोन भिन्न भिन्न प्रयोजनानुरूप किंवा दोन प्रकारच्या भिन्न भावनांनीं प्रेरित झालेलीं 'ईशस्तनवें' किंवा 'परंधाम' 'गूढ' इ. कविता (पृ. ९९, ८८) पहा. सुसंस्कृत व विचारशील मनुष्याची सगुणोपासना केवळ अंधश्रद्धाप्रधान व नुसत्या शाब्दिक मंत्रा-तंत्रादिकांच्या उच्चाराच्या स्वरूपाची असणें शक्य नाहीं. तो जें जें व जेव्हां जेव्हां सगुण देवतेचें स्तवन करील, मग तें दैवत **श्रीगणेश** असो, **श्रीशारदादेवी** असो, किंवा आपल्या बुद्धिप्रमाणें निश्चित केलेली अदृश्य सर्वव्यापी व गूढ

अशी सर्वव्यापी **निसर्गशक्ति** असो, त्या त्या देवतेचें स्तवन तो एकवेळीं आपल्या अंतःकरणाच्या आर्ततेनें, दुसऱ्या एखाद्या वेळीं स्वतःच्या उन्नतिविषयीं, जगाच्या एकंदर व्यवहाराविषयीं व स्वतःच्या लौकिक कर्तव्याविषयीं त्याच्या ज्या काय कल्पना, ज्या काय आकांक्षा किंवा जें ध्येय असेल त्याच्या वर्णनद्वारा तो ही आपली ईश्वर विषयक निष्ठा व्यक्त करील. अर्थात् त्याच्या या उदात्त व आर्त मनोवृत्तीला अनुसरून, त्याच्या स्तवनांत भाषासरणीचें शक्य तितके उज्वल वैभव दिसून, शिवाय विचार प्रदर्शनांतही भव्यता, उत्साहशीलता व भक्तिविलीन खरी सात्विकता दिसून येईल. ह्मणूनच जगांतील कोणत्याही भाषेच्या वाङ्मयांत 'स्तोत्र'पर वाङ्मय-थोडें असो, मोठें असो-विशेष उदात्त, प्रायः काव्यमय व उज्ज्वल स्वरूपाचें असतें. आपल्या इकडे तर अगदीं वेदांपासून तों प्राचीन संस्कृत व मराठी वाङ्मयापर्यंत, 'स्तोत्र'पर वाङ्मयास एक निराळेंच व आदरणीय स्थान मिळालेलें आढळतें. अशाच सोज्वल पावनकारक व आत्मोन्नतिसाधक उज्ज्वल काव्याचा निदर्शक व त्याच्याशीं निगडित असा "लहरी" शब्द आहे. संस्कृतांतील **सौंदर्यलहरी, पीयूषलहरी** [यालाच "गंगा लहरी" असें रूढ नांव आहे.] इत्यादि स्तोत्रें व त्यांचे मराठींत वामन पंडितादिकांचे अनुवाद किंवा तत्सदृश दुसऱ्या कवींच्या स्वतंत्र कृति, याच गोष्टीच्या द्योतक होत. रा. रा. दामले यांच्या "वंदनपर" विभागांतील लहान 'गीतक' अथवा स्तोत्र वजा कवितांत वरील सर्व घटकांचें रम्य मिश्रण झालेलें प्रत्ययास येतें. विशेषतः पृ. १५ वरील 'हृदय तंतूची करुनि प्रभो ! वीणा' हें स्तोत्र उत्कट भावविष्काराच्या दृष्टीनें फार सुंदर व परिणामकारक झालें आहे. या खेरीज काव्योत्कट कल्पनांची उज्ज्वलता, वर्णनांचा सात्विक आवेशयुक्त उठावदारपणा इ. आपापल्या कांहीं पृथक् वैशिष्ट्यामुळें, देशभक्तिपर भागांतील बहुतेक कविता फारच चांगल्या साधल्या आहेत, त्यांतही "स्वातंत्र्याची भूपाळी" "आव्हान गीत" "प्रातर्भूपाळी" ह्या कविता विशेष हृदयस्पर्शी झाल्या आहेत.

"केशवसुतां" च्या विचारसरणींतील जोरदार उत्साहशीलता, व अगदीं साध्या रूढ भाषाशैलीच्या द्वारें सडेतोड, भेदक, असा **बाणवेगी व बाणवेधी** किंवा 'गोफणी' च्या भडिमारासारखा हल्ला करण्याची त्यांची हातोटी रा· दामले यांच्या 'माझी बरची' (पृ· ४७) 'प्रेम' "सोडुनि मर्यादा सगळें। असति भिकेचे डोहाळे" या कवितांत त्यांच्या स्वतःच्या विचारवैशिष्ट्यासह फार

सफाईदार रीतीनें उतरली आहे. ललित व सात्विक शृंगार, दांपत्यप्रेम, अपत्य-वात्सल्य इ. कोमल व सुखमय संसारादर्शकसूचक भावनांचें रम्य आलेखन 'प्रणयदेवता' (पृ. ८३) 'हंसेरेकूळ' (पृ. २८) छकुलें गीत (पृ. ३९) 'तरि भाग्यश्री कोणाची' (पृ. ३०) विरागिणी (पृ. ८५) 'अढळ प्रतिमा' व 'साहुं कशी विरहास ?' (पृ. ८६ व ९०) गीतांत मोहक व उत्कट छटांयुक्त साधलें आहे.

शद्बयोजना, पद्यरचना, व्याकरण शुद्धि, या बाबतींत कांहीं ठिकाणीं रसापकर्षक दोष राहून गेले अहेत. उ. 'संयोग ह्रस्वास गुरुत्व देतों' हा पद्यरचनेचा नियम सरसहा नसला तरी निदान बऱ्याच ठिकाणीं उल्लंघिलेला दिसतो. 'मूर्तिमंत **तपतेजाला**' (पृ. ६५) 'व्याप **जिविचे**' (पृ. ७४) '**राष्ट्रीय**' (पृ. ४४) असा एखादा दुसरा क्षीणशक्ति, रसापकर्षक किंवा अशुद्ध शद्बप्रयोग क्वचित् डोकावतो पण या बाबतींत इतर कित्येक कवींची दुःस्थिति पहातां एकंदरीनें रा. दामले यांची काव्यरचना अशा दोषांपासून बहुधा अलिप्त अशीच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

कांहीं सांसरिक कारणांमुळें मनाची सध्यां अत्यंत विलक्षण व्यग्र स्थिति असल्यामुळें, रा. दामले यांस पूर्वी दिलेलें वचन केवळ शाद्बिकरीत्या पूर्ण करण्याच्या कर्तव्य दृष्टीनेंच ही प्रस्तावनेची कामगिरी कशीबशी बजावली आहे! अर्थात् या कामगिरींतील अनेकविध न्यूनतेची तीव्र जाणीव इतर कोणाहीपेक्षां मला स्वतःलाच जास्त व्याकूळ करीत आहे; तथापि परिस्थिति परवश अशा या लोकव्यवहारांत कित्येकदां कर्तव्यांतील न्यूनतेच्या जाणीवेनें वाटणाऱ्या अंतस्थ रूखरुखीचा परिहार केवळ शाद्बिकरीत्या कां होईना पण हातून पारपडलेल्या वचनपूर्तीचा विचाररूप **मानसिक मलमाच्या** योजनेनें कसाबसा करून घ्यावा लागतो हा अनुभव कोणास नाहीं ?

शेवटीं जगांतील सर्व मांगल्यास व यशःसिद्धीस आधारभूत असा जो **श्रीज्ञानेश्वरादि** साधुसतांचा अमर व अमृतमय वाणीरूप आशीर्वाद-त्यांनीं ईश्वराजवळ मागितलेलें पुण्यकारक 'पसाय-दान'-त्याचा नम्र भक्तिपुरःसर अनुवाद करून प्रस्तावना पुरी करतोंः—

"दुरितांचें तिमिर जावो । विश्वस्वधर्म सूर्यें पाहो ।
। जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥" **श्री ज्ञानेश्वर**

**पुणें.**
(ता. ४-८-१९३१) } **श्री. नि. चापेकर**

ता.
ता. नं.

# -:- काव्यपरीक्षण -:-

जीवाच्या सर्व शक्तींचा सांठा सांदनात्मिक स्फूर्तीत आहे. तिचें प्रकट होण्याचें पीठ अन्तःकरण. या विकासप्राप्त शक्तीला प्राचीनांनीं 'कला' म्हटलें आहे. जीवाचें संस्कार ज्या मानानें शुद्ध, शुद्धतर असतील त्या मानानें स्पंदनात्मिका स्फूर्ति तीव्र अथवा मंद असते. हीच अंतर्निहित स्फूर्ति जीवाला कार्यांत प्रवृत्त करते. ही बुद्धीला प्रतिभेचे ऐश्वर्य आणि प्रतिभेकरवीं मनाला कल्पनामाधुर्यसंपन्नता देते ह्मणून काव्यांत स्फूर्तीला आद्यस्थान दिलें असावें. प्रतिभा आणि कल्पना यांवर कवीस थोडेफार प्रभुत्व मिळवितां येईल परंतु स्फूर्तीची प्रसन्नता आराधनेनेंच मिळवावी लागतें.

सर्व जीवांची नैसर्गिक प्रवृत्ति आनंदप्राप्तीकडे असते. केवळ सौंदर्यरति हा आनंदाकडे जाण्याचा एक मार्ग आहे. प्रकृति सर्वांग सौंदर्यपूर्ण आहे. प्राकृतिक समता (Symmetry) हें सौंदर्याचें एक लक्षण आहे. अंग प्रत्यंगाची समता जितकी अधिक तितकी सुंदरता अधिक. त्याचप्रमाणें विरुद्ध वृत्तींची समता, हें मानासिक सौंदर्य. सौंदर्यासंबंधानें असें ह्मणतां येईल कीं "अत्र को देशः का जातिः 'एकत्वमनुपश्यतः' "

जड आणि मानासिक सृष्टींत असलेल्या सौंदर्याला मूर्तरूप देण्याकरितांच कलेचा जन्म. भावांचें ग्रहण करून त्यांना उचित शब्द, रेखा अथवा नाद यांच्या द्वारें व्यक्त करणें म्हणजेच कला. प्रेम, राग, द्वेष, काम, मोह, वात्सल्य, भक्ति इत्यादि अनेक भाव आहेत. कलेचा संबंध हृदयाच्या त्या भावनेकडे आहे, कीं ज्यांत सत्य, शिव आणि सौंदर्य सांठलेलं आहे. कलावन्तकृतीच्या दर्शनानें आणि तिच्या अनुभूतीनें विशुद्ध आनंद प्राप्त होऊन हीन अथवा नीच भाव विसरले जातात. यावरून असें समजूं नये कीं कला ही नीतिशिक्षकाचें काम करिते किंवा कलाप्रवीण मनुष्य सच्चरित्रतेची सृष्टि करण्याकरितां आपली कृति जगास अर्पण करतो. नीतिबोध ही कांहीं कलेची कसोटी नाहीं. तींत नीतिबोध

असेल अथवा नसेलही. जो कलेंत नीतिप्रचार करूं पाहील त्याचा उद्देश सफल होऊं शकेल; परंतु तो कलेची सृष्टि मात्र निर्माण करूं शकणार नाहीं. ज्या कृतींतून रमणीयतेचें तेज उफळून बाहेर येत नाहीं ती रमणीयता 'बेजान' होय. कलावन्ताचें रसमय हृदय त्याच्या कलेंतून एकदां प्रकाशित झालें ह्मणजे त्याचा कार्यभाग संपला. पुढील काम समालोचकाचें आहे.

एका दृष्टीनें कवींचे दोन वर्ग पाडतां येतात. एक वास्तविकतेचे प्रेमी (Realistic Poets) आणि दुसरा आदर्शवादी (Idealistic Poets) कवी कोणत्याही वर्गातील असो त्याला कल्पनेचें साहाय्य अवश्य घ्यावें लागतें. एक कल्पना सहजस्फूर्त असते आणि दुसरी प्रयासजन्य. कांहींचें तर असेंही, ह्मणणें आहे कीं ज्या कवितेंत कल्पना नाहीं, ती वास्तविक कविताच नव्हे. जर काव्यांत कल्पनेचे स्थान इतकें श्रेष्ठ असेल, तर प्रश्न असा उद्भवतो कीं एखाद्यानें जर आपल्या कवितेंत स्वतः प्रत्यक्ष अनुभविलें नाहींत असे भाव वर्णन केलेत तर, तो साक्षात्कारी कवीची बरोबरी करूं शकेल कीं नाहीं ? भावानुभवकालीं जर त्याची दशा साक्षात्कारी कवीसारखीच होत असेल तर कल्पनाद्वारें कविता करणाऱ्या कवीलाही साक्षात्कारी कवींतच गणावें लागेल आणि संभव आहे कीं तो जर एक उच्च दर्जाचा कवी असेल तर साक्षात्कारी कवीच्या कवितेपेक्षांही त्याची कविता सरस होऊं शकेल. अशी जर मनःस्थिति होणार नाहीं, तर त्या कवितेंत भावाभास उत्पन्न होईल. तेथें पाण्याऐवजीं मृगजल असतें. ज्या कवीच्या हृदयांत कधीं पवित्र भाव उत्पन्न होत नाहींत, ज्यांच्या वृत्तींचा आधार अपवित्र कल्पनांवर आहे त्यांच्या कवितेंत चांगला भाव कोठून उत्पन्न होणार ? मलिन आणि तामासिक भावना शुद्ध आनंद देत नाहींत.

नवी कला अथवा नवें साहित्य केव्हां उदयास येते ? जेव्हां मनुष्याच्या मनुष्य, समाज, शासन, स्त्री, पुरुष, इत्यादिकांशीं असलेल्या संबंधांत क्रांतिची पहाट फुटते तेव्हां. आतांचा काल तसा नसल्यानें नव्या साहित्याची कोणी फारशी अपेक्षा करूं नये.

अरुणोदयाच्या सुमारास तेजांशापेक्षां तमांश अधिक असतो म्हणून त्या वेळेच्या रमणीयतेंत कांहीं कमतरता येत नाहीं. नवीन कवींच्या नव

कवितेंत जर रमणीयतेच्या अविष्करणांत कांहीं तेज असेल तर ती रसिकाच्या चित्ताला कौतुकास्पद होते.

काव्यकलेच्या या वर दिलेल्या कसोटीस श्री. दामले यांच्या पुष्कळशा कविता माझेमते उतरतात. श्री. दामले हे अलीकडील कवींपैकीं एक चांगले कवी आहेत. यांच्या कवितेंत कल्पनांचा चकचकाट आणि भावांचा खळबळाट आपल्याला आढळणार नाहीं. रसिकाचें चित्त आपलेकडे बलात्कारानें खेंचून घेणारे दांडगे ओज त्यांत नसेल तरी पण, प्रासंगिक कविता सोडल्या तर बाकीच्या बऱ्याचशा कवितांत ओज, माधुर्य आणि प्रसाद आढळून येईल. त्यांत अर्थ, कल्पना, आणि शब्द या माधुर्य गुणांचा अधिकांश आहे. प्रमाणबद्धता (Symmetry) आणि थोडक्या शब्दांत भावादिग्दर्शन करण्याची कला त्यांना चांगली साधली आहे. वाणीचा प्रवाह शुद्ध आणि अस्खलित आहे. विषयाची विविधता आहे. कवितेच्या चाली साध्या, गोड आणि बहुतेकांच्या परिचयाच्या आहेत. त्यांत अर्थाचे सरलतेमुळें आणि मात्राभंगाचा दोष नसल्यानें कोठेंही ठेंचाळावें लागत नाहीं. व्यंजना नसल्यामुळें विचारशक्तीवर ताण पडत नाहीं. वर निर्दिष्ट केलेल्या गुणांचें आधिक्य यांच्यां कवितेंत असल्यामुळें ही **'भावलहरी'** रसिकांस आवडून त्यांच्या वाढत्या यशांत भर घालील असा भरंवसा आहे.

श्री. दामले यांच्या खालील कविता विशेष सरस आहेत. 'विदर्भ-गीत' 'ईशस्तवन', 'अरुणोदय', 'छकुलें-गीत', 'हंसरें फुल', 'प्रातर्भूपाळी', 'गतभर्तृका', 'गरीबांची कहाणी', 'हें काय', 'अढळ-प्रतिमा', 'गूढ', 'प्रणयपीर', 'राष्ट्रात्मा', 'परंधाम', 'अभिनव महिषासुरर्दिनी' ह्या कविता मला फार आवडल्या.

मु० आकोला

ता० १६।७।१९३१

नारायण मुरलीधर गुप्ते.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६६२०

# -:- अभिप्राय -:-

(प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले सर परशुरामभाऊ कॉलेज पुणें)

अकोला येथील वकील श्री० रा. रा. **वासुदेव भास्कर दामले**, बी. ए; एल्‌एल्. बी. यांना **'भावलहरी'** नांवाच्या स्वकृत काव्यसंग्रहापैकीं कांहीं प्रकरणें मला वाचून दाखविलीं तीं ऐकून मला फार आनंद वाटला. रा. दामले यांच्या काव्यांत दोन गुण उत्कटतेनं प्रकट झाले आहेत. एक मार्दव व दुसरा माधुर्य. दामले यांच्या काव्यांत या २ गुणांचें इतकें मनोहर मीलन झालें आहे कीं केवळ या दोन गुणांकरितांच ती वारंवार वाचावीशी व ऐकावीशी वाटते. या बाबतींत लेंभे, घाटे व बालकवि ठोंबरे यांच्या पंक्तीस बसण्याचा मान, कोणीही रसिक, रा. दामले यांस मोठ्या आनंदानें देईल. भावलहरींतील भिन्नभिन्न भावना सहृदयांचें अंतःकरण तरल करून सोडणाऱ्या आहेत. हंसरेंफूल, छकुलें गीत, प्रातर्भूपाळी गतभर्तृका, गरीबांची कहाणी, अडळप्रतिमा, प्रणयवीर, राष्ट्रात्मा, परंधाम, अभिनव महिषासुरमर्दिनी इत्यादि प्रकरणें या माझ्या विधानाची साक्ष पूर्णपणें पटवून देण्यास समर्थ आहेत. प्रस्तुत काव्यकलापांत प्रसाद गुण प्रधान आहे; शब्दांची योजना रसानुगुण आहे. याला गूढात्मकतेचा स्पर्श नाहीं. वीर रसाला अवसर नसल्यामुळें यांत ओज प्रायः दृष्टीस पडत नाहीं. म्हणून या भावलहरीला कंटकशून्य केतकी असें ह्मटल्यास शोभण्यासारखें आहे. सारांश, प्रस्तुत **भावलहरी** ही रमणीय कृति तिच्या जनकास प्रतिष्ठावह आहे यांत संशय नाहीं.

पुणें
ता० १८।७।३१

**लक्ष्मण शास्त्री लेले.**

ता. २१/२०/३२
४४९०

## —: हृद्गत :—

गेल्या त्रिशतसांवत्सरिक शिवजन्मोत्सवानिमित्त मी लिहिलेल्य **"शिवकालीन शाहीर"** या लघुकाव्याचें महाराष्ट्र जनतेनें कौतुक केल्यामुळें राजाराम-कालींन मराठे सरदारांनी स्वातंत्र्याकरितां अपूर्व आत्मयज्ञ करून मराठें शाहीची साताऱ्यास प्राणप्रतिष्ठा कशी केली या स्फूर्तिदायक ऐतिहासिक प्रसंगावर, 'शिवकालीन शाहीरा'चेंच पुढील कथानक **'स्वातंत्र्यसमर'** या खण्डकाव्यरूपानें जनतेसमोर मांडलें. मध्यप्रांत व वऱ्हाड विद्याखात्यानें पुस्तकालयाकरितां व बक्षिस पुस्तक म्हणून प्राथमिक शाळांतून तें मंजूरही केलें. रसिकांनीं त्याचेंही कौतुक केल्यामुळें प्रस्तुत **'भावलहरी** अर्थात् भावमुग्धचा वऱ्हाडी सोहळा' हा माझ्या निवडक स्फूट कवितांचा संग्रह मी रसिकांस सादर करण्यास उद्युक्त झालों आहे. **'भावलहरीचें'** वंदनपर, निसर्गपर, देशभक्तिपर, करुणपर, भावनापर व इतर असें सरलतेनें षड्विध वर्गीकरण केलें आहे. ह्यांतील कांहीं कविता 'मासिक मनोरंजन' 'चित्रमय जगत्' 'यशवंत' व 'केसरी' इत्यादि मासिकें व नियतकालिकें यांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

माझ्या **'भावलहरी'**चें काव्यपरीक्षण अखिल महाराष्ट्रास ललामभूत झालेले माझे कविमित्र **नारायण मुरलीधर गुप्ते** उर्फ **'बी'** यांनीं लिहून देऊन मजवर जो अनुग्रह केला त्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे. महाराष्ट्र रसिकशिरोमणि **प्रो. लक्ष्मण शास्त्री लेले** सर परशुरामभाऊ कॉलेज पुणें यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन अभिप्राय लिहून दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

येथील राजस्थान प्रेसचे मॅनेजिंग डायरेक्टर माझे स्नेही दे. भ. श्री. **ब्रिजलालजी बियाणी** यांनीं माझ्या भावलहरीच्या प्रसिद्धीचें कार्य आपण

होऊन हौशीनें शिरावर घेऊन, आत्मीय भावनेनें केलें याबद्दल त्यांचे आभार मानणें मी माझें पवित्र कर्तव्य समजतों. माझे स्नेही राजस्थान प्रेसचें मॅनेजर **द. स. अभ्यंकर** यांनीं भावलहरीचें अल्पावधींत सुंदर मुद्रण करून दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

**भावलहरींतील** सर्व चित्रें माझे स्नेही **श्री. दिनकर गणेश वैद्य** बी. ए. एल्‌एल्. बी. वकील अकोला यांनीं आपण होऊन अत्यंत हौशीनें काढून देऊन वेळोवेळीं मला अमूल्य सूचना केल्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे.

येथील वकील श्री. **नानासाहेब परांजपे** बी. ए. एल्‌एल्. बी. यांनीं वत्सलतेनें मला वेळोवेळीं मार्मिक सूचना केल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. माझे चुलते **डॉ. गंगाधर गोविंद दामले** एल्. एम्. अँड एस्. यांनीं या पुस्तकाची प्रुफें अत्यंत काळजी पूर्वक तपासून दिलीं आहेत.

शेवटीं माझ्या वरील दोन्हीही कृतीप्रमाणें हीही कृति रसिकांच्या आदरास प्राप्त होवो येवढींच त्या परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

अकोला<br>
ता० ७ आगष्ट १९३१

**वासुदेव भास्कर दामले.**



सामाईक हिन्दु कुटुम्बाचे आदर्शभूत कर्ते पुरुष असे माझे परमपूज्य वडील
कै. रावजी गोविंद दामले यांस, त्यांची ईश्वरनिष्ठा, निःसीम
देशभक्ति, सत्वशीलता, सत्यनिष्ठा, सहृदयता, दुर्दम्य उत्साह,
अचाट मनोधैर्य, सहजप्रेमळपणा, अलौकिक वात्सल्य,
निष्कपटीपणा व आनंदी स्वभाव इत्यादि गुणांचें
पुण्यस्मरण ह्मणून त्यांच्याच पुण्याईचें
फल हें माझें 'भावलहरी' नामक
काव्यपुष्प मीं त्यांच्या चरणीं
अत्यंत नम्रतेनें अर्पण
केलें आहे.

—वासुदेव

नं. ........
ता. ........
ग्रं.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

राजस्थान प्रकाशन विभागाचें दुसरें पुस्तक आज आह्मी रसिकांच्या सेवेस सादर करीत आहोंत. प्रस्तुत **'भावलहरी** अर्थात् **भावमुग्धेचा वऱ्हाडी सोहळा'** हा काव्यसंग्रह विदर्भवासीय सुप्रसिद्ध कवि आणि **'विदर्भगीत' शिवकालीन शाहीर'** व **'स्वातंत्र्य समर'** इ० काव्याचे कर्ते श्रीयुत् **वासुदेव भास्कर दामले** बी. ए. एल्‌एल्. बी. वकील यांच्या निवडक स्फुट कवितांचा संग्रह असून त्यांत त्यांची प्रतिभासंपन्न भावसृष्टी उत्कटतेनें वाचकांच्या नजेरसमोर येईल असा आह्मांस भरंवसा वाटतो.

आमचे विनंतीस मान देऊन श्री. **दामले** यांनीं आपलें पुस्तक आह्मास प्रकाशन विभागासाठीं दिलें याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

विदर्भवासीय वाङ्मयोपासकांच्या अशाच सुंदर वाङ्मयकृती यापुढें आम्ही जनते समोर मांडणार आहोंत.

अकोला
७ आगस्ट १९३१

प्रकाशक.

———

# -: अनुक्रमणिका :-


| विषय | | पृष्ठांक |
|---|---|---|
| | अर्पण ... ... ... ... | १ |
| | भावमुग्धा ... ... ... ... | ३ |
| | **वंदनपर** | |
| १ | विदर्भगीत ... ... ... ... | ७ |
| २ | गणेशाष्टकम् ... ... ... ... | ११ |
| ३ | गणेशाष्टकम् ... ... ... | १३ |
| ४ | ईशस्तवन ... ... ... | १५ |
| ५ | हिंदुमहासभा [ईशस्तवन] ... ... ... | १७ |
| ६ | शुद्धिसभा ,, ... ... ... | १८ |
| ७ | विदर्भवनिताविश्राम [ईशस्तवन] ... ... | २० |
| | **निसर्गपर** | |
| १ | प्रबोधन ... ... ... ... | २२ |
| २ | अरुणोदय ... ... ... ... | २४ |
| ३ | छायाचित्र ... ... ... ... | २६ |
| ४ | सखे कल्पने ... ... ... ... | २७ |
| ५ | हंसरें फूल ... ... ... ... | २८ |
| ६ | तरि भाग्यश्री कोणाची येइ फळाला ... ... | ३० |
| ७ | छकुलें-गीत ... ... ... ... | ३१ |
| | **देशभक्तिपर** | |
| १ | प्रियहिंदभूमी ... ... ... ... | ३२ |
| २ | स्फूर्ति-गीत ... ... ... ... | ३५ |
| ३ | स्वातंत्र्याची भूपाळी ... ... ... | ३७ |
| ४ | आव्हानगीत ... ... ... ... | ३९ |

५ प्रातर्भूपाळी ... ... ... ... ४१
६ गणेशोत्सव ... ... ... ... ४३
७ दासनवमी ... ... ... ... ४४
८ स्वातंत्र्यदिन ... ... ... ... ४६
९ माझी बरची ... ... ... ... ४७

## करुणपर

१ कळणार तुला कुठुनी–गरिबींत काय ती झुरणी ... ५३
२ शोकसंतर्पण ... ... ... ... ५६
३ गतभार्तृका ... ... ... ... ५८
४ गरीबांची कहाणी ... ... ... ५९
५ निराशेतील उद्गार ... ... ... ६०

## भावनापर

१ हें काय ... ... ... ... ६५
२ आशा ... ... ... ... ६७
३ माझा ईश्वर ... ... ... ... ६९
४ खुळी कल्पना ... ... ... ... ७१
५ विश्वप्रेमाची भूल... ... ... ... ७४
६ वायूंत तरंगणारे बोल ... ... ... ७७
७ झोला ... ... ... ... ७८
८ प्रेम ... ... ... ... ७९
९ सोडुनि मर्यादा सगळे, असति भिकेचे डोहाळे ... ८१
१० प्रणयदेवतेस ... ... ... ... ८३
११ भावला ... ... ... ... ८४
१२ विरागिणी ... ... ... ... ८५
१३ अढळ प्रतिमा ... ... ... ... ८६
१४ गूढ ... ... ... ... ८८
१५ साहुं कशी विरहास ... ... ... ९०

१६ प्रणयपीर ... ... ... ... ९२
१७ अहंकार ... ... ... ... ९४
१८ मायाबन्ध ... ... ... ... ९६
१९ कळी उमलावी रसिकता मुर्दे डोलावी ... ... ९७
२० राष्ट्रात्मा ... ... ... ... ९८
२१ परंधाम ... ... ... ... ९९
२२ अनंत ... ... ... ... १००
२३ असहयोगिनी ... ... ... ... १०२

इतर

१ क्रीडांगण ... ... ... ... १०५
२ शुभाशीर्वाद ... ... ... ... १०६
३ गुरुवर्य ताडण ... ... ... ... १०८
४ दुर्गास्तवन ... ... ... ... ११०
५ अभिनव महिषासुरमर्दिनी ... ... ... १११

---

चित्रांची सूची.

भावमुग्धा
छकुलें–गीत
गतभर्तृका
प्रणयपीर
अहंकार
अभिनव महिषासुरमर्दिनी

---



चित्रकार-- दि. ग. वैद्य.

" अमृताचा ओंठावरला घोस ग !
पापा देऊन गोड गोड हांस ग "

—छकुलें गीत.



चित्रकार—  दिनकर गणेश वैद्य
बी. ए., एलएल. बी.

" भावमुग्धा कोमलांगी काव्यकलिका हे "

—भावमुग्धा.

६६८०

## —: अर्पण :—

तारुण्यानें मुसमुसली
प्रेमरसानें रसरसली
माधुर्यानें जी भरली
पूर्ण विकसली हृदयकळी
गोजिरवाणी
तुजलागोनी
ठेवी जपुनी
गंध प्रिये ! या कलिकेचा
भुलविल हृदयाला साचा

मानसरूपीं सरोवरीं
निर्मळ प्रेमाच्या नीरीं
कमलिनि प्रफुल जी झाली
तिचीच कलिका ही फुलली
आमोदाची
दिव्यत्वाची
माधुर्याची
खरी कल्पना एक तुला
गूढ परी हें जगताला

प्रेमाश्रूंचा लोटूं दे
पूर तियेवरी प्रिय कान्ते !
प्रेमाश्रूंच्या उदकानें
खुलेल द्विगुणित तेजानें

अश्रुसिंचनीं
ती चिरतरुणी
कलिका होउनि

गंधें हृदयें डुलवील
भरतें प्रेमा येईल

## —: भावमुग्धा :—

भावमुग्धा कोमलांगी काव्य-कालिका हे ।
रोमरोमीं रसिकवृत्ती रंगवीताहे ।
दरवळलाहे दिशादिशांला परिमल तीचा ।
बहरलेली भावलीला भाविकां वाहे ॥

वंदनपर.

ता.



## —: विदर्भ-गीत :—

[ रा. यादव माधव काळे एम्. ए. एल्एल्. बी. वकील बुलढाणा यांनीं लिहिलेल्या विदर्भाच्या इतिहासास अनुसरून सदर्हू गीत पुणें येथील मध्यप्रान्त व वऱ्हाड विद्यार्थिसंघाच्या कार्य प्रसंगीं प्रारंभीं ह्मणण्यास उपयोगी पडावें ह्मणून त्या संघाचे अध्यक्ष गु. प्रो. चाफेकर यांनीं करण्यास सुचविल्यावरून हें गीत रचलें आहे. ]

गाऊं विदर्भ—भूला
त्या वंद्य मातृभूला
विद्या, कला, निधींची
माहेर जी गुणांची
चढवूनि वैभवाला—गाऊं०॥

स्मरणीय पुण्यसरिता
वाहे जिथें पयोष्णा
वितरीत सम्पदेला—गाऊं०॥

'कार्पास-भू' जियेची
ख्याती पुरातनीची
अजुनी न खण्ड जीला—गाऊं०॥

अमुचा विदर्भ ठेवी
'समभाव' बन्धुवर्गी
महशूर हें जगाला—गाऊं०॥

'आतिथ्य-धर्म' अमुचा
लौकीक आजवरिचा
आहे अखंड भरला—गाऊं०॥

'दमयंति' पुण्यचरितें
आदर्श भारतातें
प्रसवी पतिव्रतेला—गाऊं०॥

'हरि-रुक्मिणी-विवाहीं'
कर्तृत्व शक्ति मिळणीं
सुखसोहळाच इथला—गाऊं०॥

अमरावतींत अम्बा
वैदर्भ संकटाला
बसली निवारण्याला—गाऊं०॥

"वैदर्भ-रीति" सरसा
असुनी अतीव सरला
आदर्श वाङ्मयाला—गाऊं०॥

गीर्वाण वाङ्मयाचा
कण्ठाच शारदेचा
भवभूति येथ झाला—गाऊं०॥

गाजे महानुभाव
सारस्वतप्रभाव
तज्जन्म येथ झाला—गाऊं०॥

कृति एकनाथ कविची
जी माय भाविकांची
तो एकनाथ इथला—गाऊं०॥

ज्याची अभंगवाणी
प्रत्यक्ष देववाणी
तो नामदेव इथला—गाऊं०॥

कवि-श्रीमुकुन्दराज
कविता-कला-विलास
येथेंच पूर्ण झाला—गाऊं०॥

लीलावती पित्याला
आचार्य भास्कराला
जी जन्म देई तिजला—गाऊं०॥

स्वातंत्र्य-ज्योत लावी
चैतन्य मूर्त स्फुरवी
तो रामदास इथला—गाऊं०॥

शिवमाउली जिजाई
येथेंच जन्म घेई
ठावें न हें कुणाला?—गाऊं०॥

ती शूर रायबागीण
शिवबासवें लढून
द्विजवंश भूषवीला—गाऊं०॥

तो भोसले रघूजी
रणशूर धैर्यशाली
येथेंच कीर्ति ग्याला—गाऊं०॥

कवि संत देवनाथ
तैसे दयाळनाथ
गुरुशिष्ययोग इथला—गाऊं०॥

धांवा दयाळजींचा
विख्यात द्रौपदीचा
गाती विदर्भ महिला—गाऊं०॥

अपुला विदर्भ विभवें
नटवूं गुणप्रभावें
वचनास ह्याच बोला—गाऊं०॥



संकाश ... २०८५
२१/१०/३२
६६५०

# ❀ गणेशाष्टकम् ❀

मी वंदितों परमपावनपादपद्म ।
भक्तांस जें सकल केवळ सौख्यसद्म ॥
यत्पूजनें भवभयें पळती समस्त ।
संमोह यत्स्तवन घालवितें क्षणांत ॥

वृत्ती सदैव मम भक्तिरसीं तरंगो ।
वाणी मदीय तव नामरसांत रंगो ॥
तूझेंच रूप मम लोचन नित्य पाहो ।
कर्णास ध्यास यशसेवन हाच राहो ॥

केव्हां बुडेन न कळे भवसागरीं या ।
गेलों खचून मज धीर नसे तराया ॥
तृष्णातरंग मज लोटिति दूर दूर ।
दुर्वासना–सुसरिही भिववीति फार ॥

तूं कर्णधार प्रभुजी ! तुजवीण कोण? ।
नेईल जीवतरि पैलथडी तरून ॥
तूं भक्तवत्सल कृपानिधि देव देव ।
तारावयासि करिसी मग कां विलंब ॥

तूं माय मी प्रभुवरा ! तव वत्स दीन ।
तूं लोटिल्या कळवळा करिजेल कोण ? ॥
लोटी सुतास तरि माय कडेसि घेते ।
वात्सल्य तें जननिचें कळलें कुणातें ॥

आहेस तूं जलद, चातक मी तसाही।
सेवावया यशसुधामधुबिन्दु बाही ॥
तृष्णा प्रभो ! तुजविणें शमवील कोण ? ।
पाजोनिया यशसुधा करि प्राणदान ॥

आधींच संत तपवंत तयां त्वदीय।
येईल थोरपण उद्धरिल्यास काय ? ॥
होईल लौकिक तुझा जगतास ठावा।
नेल्या निजालयिं मला पतितास देवा ! ॥

द्वारीं तुझ्या व्यथित याचक पातलाहे।
ठेवावया वरदहस्त प्रसाद बाहे ॥
तूझा प्रसाद घडल्याविण ना उठेन।
गाऊनि मंगल गजानन आळवीन ॥



# ❀ गणेशाष्टकम् ❀

नमन अघहराला आद्यपूज्या गणेशा ।
विनवि निरसण्यातें सर्व माझी निराशा ॥
सफल मम मनींची कामना पूर्ण होवो ।
निजसुखसदनातें शेवटीं दास पावो ॥

कमलनयनमूर्ते ! श्रीगणेशा ! सुरेशा ! ।
भजनिं परम तुझ्या गुंतली सर्व आशा ॥
वरदकर सुरेशा ! मस्तकीं जैं पडेल ।
यशकवन रचाया स्फूर्ति मातें चढेल ॥

परिजनभयशंका नाशिली ज्या प्रभूनें ।
व्यसन तरि कथावें काय त्यां लेंकरानें ॥
निखिल जग भरोनी राहिला जो उरोनी ।
सदयहृदयमूर्ती केवळ प्रेमखाणी ॥

चरणकमल सेवा सेवकाला घडावी ।
नयनिं मम प्रभूजी ! मूर्ति तूझी जडावी ॥
मधुर मधुर तूझी गाउनी गोड गाणीं ।
तव चरणसरोजीं दंग होईल गानीं ॥

शशिविण रजनी ना केधवांही विराजे ।
तिलकविरहिता ते नोवरी काय साजे ? ॥
मन गजवदना ! हें नोवरी जाहलेंसें ।
सफल जनन माझें प्रेम झाल्यास तैसें ॥

वरदकर धराया शीर्ष हें नम्र झालें ।
वर तव परिसाया कर्ण झाले भुकेले ॥
शिरसिं कर प्रभूजी ! ठेवुनी दान देशी ।
तळमळ हृदयींची केधवां नविवीशी ? ॥

करुणरससुधेचा लोटला पूर किंवा ।
उमज मुळिं पडेना जाहलें काय तेव्हां ॥
परमकरुणमूर्ती ठाकली मोरयाची ।
कवळुनि हृदयासीं हुंगिलें मस्तकासीं ॥

नयन भरभरोनी पाहिलें रूप श्रीचें ।
सकल गगन मातें चोज झालें जिवींचें ॥
भवभय नुरलेंही भान गेलों भुलोनी ।
उचलुनि प्रभुरायें घेतलेंही करांनीं ॥

# —: ईशस्तवन :—

हृदयतंतूंची करुनि प्रभो ! वीणा ।
छेडुनी ती घेईन गोड ताना ॥
बोल तींतोनी सत्य निघायाचे ।
जनन जीवाचें सार्थ करायाचें ॥

चित्र मातीचें रम्य सांपडेल ।
चेतनेविण परि मोल होय फोल ॥
कशी चित्रीं उतरेल चेतना ती ।
हीच हृदयातें नित्य असे खंती ॥

कोण चित्रीं चैतन्य ओतणारा ।
मोल मातीला श्रेष्ठ आणणारा ॥
असा शिल्पी शोधूनि काढण्याचा ।
धडा झालासे आज जीविताचा ॥

कितीही करिं धरुनि मंजु वीणा ।
यत्न केला घेण्यास गोड ताना ॥
दिव्य गानध्वनि कुठुनि निघायाचा ।
प्रेरणेविण कर काय फिरायाचा ॥

तुझ्या देवा ! एकाच लकेरींत ।
भुवनमात्रें सांठोनि ठेवलींत ॥
सकल विश्वा मोहूनि टाकण्याचा ।
तुझा गानक्षण दिव्य असायाचा ॥

प्रसादानें प्रभु प्रेरणा घडेल ।
मंजुवीणेवर नीट कर फिरेल ॥
सूर सुंदर उमटेल लकेरीचा ।
विसर तीनें मम मजसि पडायाचा ॥

तुझी माझी होऊनि एक तान ।
तुझेंमाझें होईल एक गान ॥
भाव माझे हरतील तुझ्या गानीं ।
तुझ्या ठायीं जाईन मी विरोनी ॥

हृदयभृंगा ! प्रेमार्द्र ईक्षणानें ।
हृदयनलिनी विकसेल निश्चयानें ॥
दलावृतमधुनिस्यन्द तो स्त्रवेल ।
हरी भरला विश्वांत दाखवील ॥



# —हिंदुमहासभा—

## ईशस्तवन

( अकोला येथें पंडित मदनमोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या हिंदु-महासभेच्या प्रसंगीं ह्मटलेलें. )

वंदन आधीं गणरायाला ।
धर्मकार्य हें साधायाला ॥ध्रु०॥
चित्शक्ती जी करी धारणा ।
तरुण भारतीं ती बिंबविण्या ।
तनमनधनही कार्यि अर्पिण्या ।
लावी हृदयीं बाणायाला ॥

धर्म सनातन संवर्धाया ।
सकल सुखांचें मूळ जगीं या ।
स्वातंत्र्यश्री संपादाया ।
लावी सत्पथ आक्रमिण्याला ॥

सहिष्णुतेची निजधर्माची ।
नौबत झडली त्रिभुवनिं साची ॥
तत्व त्यांतलें आकळण्याची ।
स्फुरो अन्तरीं बुद्धि दयाळा ! ॥

अन्तःशुद्धी पूर्ण करोनी ।
संघशक्तिचा कोट उभारुनि ।
स्वीकृत कार्यीं यश संपादुनि ।
जन्म सार्थकी लावि दयाळा ॥

———

## — शुद्धिसभा —

### ईशस्तवन

[अकोला येथें ब्रह्मचारी विनायकबुवा मसूरकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या शुद्धिसभेच्या प्रसंगीं ह्मटलेलें.]

वंदन त्या ईशा । सुरेशा ॥
मुनिजनमानसपंकजकोषा ॥ ध्रृ० ॥

हिंदू आह्मी अद्वैताचें
निशाण रोंवुनि बसलों कधिचें
शुद्धिकार्य परि साधायाचें
ओतीं स्फूर्ती हृदयीं ईशा ! ॥ ध्रृ० ॥

समानतेची द्वाहि फिरवुनि
सर्व विषमता टाकूं जाळुनि
विश्वबन्धुता सार्थ करोनी
दावूं जगतीं पुराणपुरुषा ॥ ध्रृ० ॥

अत्यंज अमुचा हिंदु असोनी
परधर्मी तो देउं न लोटुनि
धर्मबन्धु तो अमुचा ह्मणवुनि
तोषवुं त्या श्रीपुराणपुरुषा ॥ ध्रृ० ॥

धर्म आमुचा स्वीकाराया
तळमळ लागे ज्यांच्या हृदया
शुद्ध करोनी त्या शांतवुया
निजधर्माच्या नादवुं घोषा ॥ ध्रृ० ॥

अध्यात्माचें तत्व सनातन
मानवजातीशांतिनिकेतन
सर्व यशांचें अंतिम साधन
पावो चिर जय तें विश्वेशा ! ॥ ध्रु० ॥

# विदर्भवनिताविश्राम

## —प्रार्थना—

(अकोला येथें भरलेल्या लेडीज होमक्लासच्या प्रदर्शनप्रसंगीं ह्मटलेलें.)

( राग-भूप-ताल-त्रिताल. )

मंगलधामा परमकृपाळा
भक्तवत्सला दीनदयाळा ॥ ध्रु० ॥

बुद्धि प्रसादें विकास पावे
स्फूर्ती हृदयीं सदा उद्भवे
सिद्धिनायका वंदू भावें
जो प्रिय झाला छात्रगणाला ॥ ध्रु० ॥

देशभक्तिचें बीज रुजोनी
धर्मनीतिची साथ घालुनी
झिजो देह हा देशकारणीं
प्रसाद होतां हेतु साधला ॥ ध्रु० ॥

ज्ञानसुधारस पाजुनि संतत
निर्मल, निरलस, संशयविरहित
स्त्रीजातीचीं मनें सुसंस्कृत
निश्चयें करीं दीनदयाळा ! ॥ ध्रु० ॥

फुलोत अमुचीं मनें निशिदिनीं
सौख्यसंपदा नांदो भुवनीं
झुरो स्वर्गही पाहुनि धरणी
हीच विनंती दीनदयाळा! ॥ ध्रु० ॥

———

# निसर्गपर.

# —प्रबोधन.—

(येथील गर्ल स्कूलमधील मुलींच्या गर्बा नृत्याकरितां तयार केलेलें.)

कमल-नील-लोल-लोचना विकसि भुवनसुंदरा ! ।
मांगल्य-रंगिं नटवीं अरुण गगन-मंदिरा ॥ध्रु०॥

सुरभि शीत पवन डुलत ।
दशदिशां दरवळत ।
स्वागत खग-गण कूजनिं करित भास्करा ॥
संमार्जुनि अंगणांत ।
रांगोळी घालितात ।
भूवरतीं रेखितात गृहिणि रवि-सुधाकरा ॥ध्रु०॥

वांसरेंही दुडदुडत ।
धेनूकडे चाललीत ।
दृश्य गोड काय तुला मोहवी न नंदकुमरा! ॥ध्रु०॥

माय करी गोदोहन ।
करिं वाटी जा घेउन ।
प्राशाया पयधारा धांव हरी ती मधुरा ॥ध्रु०॥

यमुनेचें जल भरुनि ।
गोपी येति परतुनि ।
मंद मंद पद मोजुनि ध्याति यदुवरा ॥ध्रु०॥

खेळगडी खेळाया ।
बसले ते यदुराया ।
खेळ तुझा मांडोनी डुलवि ही धरा ॥ध्रु०॥

मिसळुनिया त्यांत हरी ।
संसारीं मोद वितरि ।
मंगलता मूर्त उभी करि रे करिं श्रीधरा! ॥ध्रु०॥



# —: अरुणोदय :—

सृष्टी निसर्गवसनीं नटली नितान्त ।
कुंजीं विहंग रमले मधु कूजनांत ॥
आला नभीं अरुण सारुनिया तमास ।
जाणों जगास नवजीवन द्यावयास ॥

बालार्क-रक्तकिरणीं नभ चित्र साजें ।
प्राची-वधू-वदनिं रम्य हंसें विराजें ॥
पुष्पें विलोल फुललीं, मधु गंध चाले ।
वायू तसा सहज-शीतल मंद डोले ॥

झाल्या दिशां सकल धुंद मरंदवासें ।
उत्साहलें अखिल विश्व मनांत भासें ॥
हा काल जागृत करी जड-जीवितांस ।
चैतन्य मानवहृदीं वितरील खास ॥

मंदाकिनी-विमल-सोज्वल-नीलरंग ।
मंदानिलें जलिं उचंबळलें तरंग ॥
कोंदें निसर्ग-रमणी-प्रतिबिंब त्यांत ।
चैतन्य निर्झर झरे मम अंतरांत ॥

हा गंध मंद मलयाचल-चंदनाचा ।
कीं काय नंदनवनीं फुलल्या फुलांचा ॥
कां पारिजातक फुले सुर-काननीचा ।
सत्काव्य-गंध न कळे पसरे कवींचा ॥

बोधी जनास अरुणोदय काय ऐक ।
बा भारता ! त्वरित जागृत हो विलोक ॥
" आला तुझा उदयकाल हितास साधीं– ।
नैराश्य-रात्र सरली " अरुण प्रबोधी ॥

झालों निमग्न बघुनी हरिचा पसारा ।
गेलों स्व-भाव विसरूनि मदीय सारा ॥
विश्वीं भरोनि उरला वद कोण आहे ? ।
चैतन्य तोच जगतीं हरि ओतिताहे ॥



# -: छायाचित्र. :-

पुष्पांनीं फुललया, फलीं अतिनता, सौंदर्यपूर्णा लता ।
इर्षेनें जलदर्पणीं निरखितीं रूप स्वयें तत्वतां ॥
माझें चित्र जलीं जधीं विलसलें मच्चित्त वेडावलें
छायाचित्र बघोनि कोण हृदयीं सांगा मुदें ना डुलें ? ॥

अन्तस्ताप हरावयासि उदया आला शशी हा नभीं ।
वायूही अति मंद मंद विचरे आनंदवी सौरभीं ॥
नाना पुष्पयुता लता तरुतती गर्वें किती डोलती ।
" नाहीं सुंदर आमुच्याहुनि कुणी" सृष्टीस संबोधिती ॥

स्वेच्छें नीरपटावरीं नरहरी वेली, फुलें रंगवी ।
तारा ह्या नसुनी स्वयें प्रभु सुमें स्वर्लोकींची सांठवी ॥
पृष्ठीं सुंदर मंदमंद लहरी वेडाविती मन्मती ।
होतां बिंबित शीत रश्मि विधुचे शोभा किती दाविती ? ॥

स्वर्गींचा पट हा कुणास्तव कुणी येथें कधीं आणिला ? ।
वाटे हा पट निर्मिला प्रभुवरें लोळावयाला मला ॥
आज्ञा ही प्रभुची मनीं समजुनी नीरीं उडी घेतली ।
होतों पोहत दृश्य ना गवसलें आशा मनीं राहिली ! ॥

छायाचित्र तरंग सुंदर मनीं आणोनिया मोहवी ।
सौंदर्यैकनिधान ही प्रभुकृती माझी मती कुंठवी ॥
ईशा ! काय जगांत गूढ असलें त्वां ठेविलें ओतुनी ।
जों जों या कृतिचा विचार करितों येतोस तूं मन्मनीं ॥

# सखे कल्पने !

उंच उंच गे स्वैर भराऱ्या मार कल्पने ! सखे !
वरती आक्रमिणें सारिखें ॥
दिशा उजळुनि निसर्ग हंसवी सुहास्यवदना उषा ।
लोपली पार निराशा-निशा ॥

आनंदाचा झरा भरुनिया वाहुनिया चाले ।
विश्वही डोलाया लागलें ॥
शीत मंद मधु परिमल रिझवी मना ।
मधुर मधुरतम परिसुनि खगकूजना ।

तरल तरलशा उद्भवती भावना ।
मांगल्याचा प्रेमरंगही उचंबळुनि आला ।
अजुनही अवसान न कां तुला ?
उंच उंच गे स्वैर भराऱ्या मार कल्पने ! सखे !
वरती आक्रमिणें सारिखें ॥

# ....हंसरें फूल....

[ एका अव्याज मनोहर अल्लड मुलीस पाहून ]

निसर्गभूषण मधुतम निर्मल हें हंसरें फूल ।
ईशकृतीचें दृश्य मनोहर जगीं न ज्या मोल ॥

क्षणांत इकडें, क्षणांत तिकडें, दृष्टी वळवीते ।
कुतूहलानें काय पाहते कोणा हें कळतें ? ॥

राग कोंदला गालीं म्हणुनी फुगीर कां दिसती ।
रुसवा असला धरी कुणावर सांगा मजला ती ? ॥

गुच्चा कोणी हळुंच घेतला लाडानें म्हणुनी ।
छटा गुलाबी दिसे तयावरि गेली पसरोनी ॥

मृदुल मृदुल हे गाल रेशमी पाहुनि कोणीही ।
म्हणति विनोदें गुच्चा घेउनि चावट कुठली ही ॥

पापा कोणी घेतसमयीं मान बळें फिरवी ।
उसना आणुनि राग बालिका तट्ट गाल फुगवी ॥

शीतल लहरी कुंतल हलवुनि खुलविति मुख फार ।
कुरळयाकुरळया कुटिल कुंतलां करें करी दूर ॥

दादा कसला हा चांदोबा उंच कसा उडला ।
रांगोळीच्या ठिपक्यांमध्यें जाउनि कां बसला ? ॥

अशी पांढरी ही रांगोळी कुठुनी आणियली ? ।
चलरे दादा! वरतीं जाऊं मौज बघूं सगळी ॥

दिल्या उधळुनी नील अंगणीं लाह्या कोणी या ।
माईसम कां तिथें न कोणी भरुनि ठेवाया ॥

मोतिच मोती नभीं विखुरलें सर कां हा तुटला ।
सांग कुणाचा वेंचुनि देऊं दादा ! तो त्याला ॥

असले जीचे प्रश्न सदोदित गूढ मला दिसती ।
या प्रश्नांना उत्तर कोणी देइल कां जगतीं ॥

मुलांफुलांना एकतरूचीं कवि गणतात फुलें ।
वदा कोणता तरू असे हा कोणा जरि कळलें ॥



# "तरि भाग्यश्री कोणाची येई फळाला !"

दरवळला गंध तुझ्या सुमवेणीचा ।
रव रुम्झुम् उठलासे मंजुळ साचा ।
पुलकित सृष्टी पुलकित हृदया बहरुनि गेली ।
तोंच तुझा क्षण उगवे आगमनाचा ॥

उन्मादक गे ! सौंदर्या येइ बहार ।
तनुलतिका नित्य नवा दाखवि नूर ।
लावण्याची मोहनमूर्ती भूतलिं आली ।
रंजविण्या रसिकां कां तव संचार ? ॥

नव उत्फुल्लीं कमलीं कां भृंग विराजे ।
कुंदकळ्या हास्यसुधा भाव विकासे ।
अवतरलीसे रति मदनाची मूर्तिमती ही ।
प्रणयिजनां भारुनिया ही उरलीसे ॥

मधुमधुरा बोलसुधा श्रवणिं ओतुनी ।
हृत्कमला विकसविसी मंजुभाषिणी ।
नयनशर तुझा एकच जीवा करि घायाळ ।
आलिस कां हाच मनीं हेतु धरोनी ? ॥

प्रणयिजनां प्रणयाची मूर्ति विलोला ।
काव्यच तूं कविरसना नाचविण्याला ।
कां हृदयेशा शोधायाला स्वतां निघालिस ।
तरि भाग्यश्री कोणाची येइं फळाला ! ॥

# " छकुलें-गीत "

[दिवे लागणीला आईनें आपल्या तान्हुल्यास खेळवितांना हें गीत म्हणावयाचें असून बापानें तें चोरून ऐकावयाचें आहे.]

काउचिऊचा घास शेवट घेउन ग ।
निपटिचिपटी करूं बाई जेवण ग ।
हम्मा हम्बेरे झालि दिवेलागण ग ।
देवापुढें समइ ठेवुं लावुन ग ।
वात सारुन करूं ज्योत नीट ग ।
दृष्ट काढून बाइ लावुं तीट ग ।
'शुभंकरोति' देवांपुढें म्हणुन ग ।
घालुं भावें त्याला लोटांगण ग ।
बोल बोबडे बोल तूझें बोल ग ।
सोनूचाफ्याचि कळि नाजुक फूल ग ।
घालुं पांचूचा हिरवा कानिं डूल ग ।
हिऱ्यामोत्यांचा पायिं तुझ्या चाळ ग ।
चांदण्यांची करीन तुला झूल ग ।
खेळगडी चांदोबाशिं खेळ ग ।
अमृताचा ओंठावरला घोंस ग ।
पापा देऊन गोडगोड हांस ग ॥

# ❀ प्रिय हिंदभूमि ❀

प्रिय हिंदभूमि अमुची–स्वर्गीयसंपदेची ॥
सुरभूमि वेदभूमी ।
ही विश्वधर्मभूमी ।
आदर्श ही जगाची–स्वर्गीयसंपदेची ॥प्रिय.॥

बल–सत्व–सत्यभूमी ।
विख्यात त्यागभूमी ।
खनि वीर्यवैभवाची–स्वर्गीयसंपदेची ॥प्रिय.॥

तिजला स्वतंत्र बघणें ।
तरि सार्थ येथ जगणें ।
इच्छा तिच्या सुतांची–स्वर्गीयसंपदेची ॥प्रिय.॥

गळले गळोत प्राण ।
तिजकारणीं फुटून ।
तेणेंचि कीर्ति अमुची–स्वर्गीयसंपदेची ॥प्रिय.॥

स्वातंत्र्य पौरुषानें ।
मिळवूं तिच्या कृपेनें ।
जननीच पौरुषाची–स्वर्गीयसंपदेची ॥प्रिय.॥

# देशभक्तिपर

## —: स्फूर्तिगीत :—

मोहुं गायनीं । स्फूर्तिपूर्ण गान रचुनि । टाकुं भारुनी ॥ ध्रु० ॥

स्वत्वाचा रवि लपला ।
परवशता कांच गळां ।
करित जाचणी ॥

जगण्याची भ्रांति पडे ।
प्रेतकळा चोहिंकडे ।
दिसत लोचनीं ॥

सुखविलास सुचत अजुनि ।
पाहुनि सुत देशजननि ।
हळहळे मनीं ॥

वीररसा सजवाया ।
सज्ज सारे या समया ।
वाटते मनीं ॥

नव रस जरि सौख्यकाळीं ।
वीर रसचि या काळीं ॥
योग्य गायनीं ॥

पूर्वज गुण आठवुनी ।
देशाचें हृद्य स्मरुनि ।
घेऊं वाहुनी ॥


स्फूर्तिगीत रंगवुनी ।
जडजीवां जागवुनी ।
काव्य गाउनी ॥

राष्ट्राच्या अणुअणूंत ।
स्फूर्तीचा दिव्य स्रोत ॥
देउं ओतुनी ॥

रणकाव्यीं गुंगवुनी ।
देशभरीं एकध्वनि ।
देउं उठवुनी ॥

उदयोन्मुख राष्ट्र करुनि ।
सकल धरा हर्षवूनि ।
दिव्य गायनीं ॥

हृदयाचा हाच ध्यास ।
देशाचा सत्य दास ।
होउं जन्मुनी ॥



# स्वातंत्र्याची भूपाळी

ऊठ भारता ! स्वातंत्र्याची संजीवनि गर्जत ।
परवशतेचा पाश छेदुनी होई अतां मुक्त ॥

चित्सूर्याची प्रभा उज्वला कुण्डलिनी स्फुरली ।
मायभूमिच्या उद्धाराची गाऊं भूपाळी ॥

आत्मबलाच्या प्रभादीप्तिचा लोळ चण्ड उफळे ।
अतां पाशवी विराटशक्ती दुबळी त्यांत जळे ॥

हिंदनिवासी बन्धूबन्धू स्वतंत्रतासंगरीं ।
मायभूमिच्या सौभाग्याची लाज धरूं अंतरीं ॥

क्षुद्र कलह निज विसरुनि आधीं देशोद्धार करूं ।
उद्धाराचा अखण्ड हृदयीं गतिधर्म धरूं ॥

भिक्षांदेही लाङ्गलचालन मार्ग न वीरांचा ।
बाणा एकच पंथ गिरवावा देशहुतात्म्यांचा ॥

सुधास्यंदिनी देवा ! नादवि मुरली या भारतीं ।
उदासीनतापटल छेदुनी करील जी जागृती ॥

बाहुबलाची दिगंत कीर्ती झाली जी भारतीं ।
होइल कैशी नवतरुणां त्या शक्तीची विस्मृति ॥

शरीर संवर्धनें अलौकिक बाहुबला मिळवूं ।
सिंहगर्जना आत्मबलाची जगतीं दुमदुमवूं ॥

तरुणभारतीं वीरश्रीच्या तेजां स्फुरवूं या ।
राख उडवुनी स्वदिरांगारा प्रदीप्त ठेवूं या ॥

राष्ट्रियध्वज उभारुनीया स्वतंत्र हिंदुस्थान ।
घोर गर्जना उठवूं जाइल भेदुनि पार वितान ॥

जळजळणारा स्वातंत्र्यात्मा घरोघरीं निपजो ।
कंसमर्दना ! नवावतारीं ब्रीद तुझें जागो ॥

भारतभूची ध्वजा तिरंगी ठेवूं फडकावित ।
आत्मबलाचा देशोदेशीं उठवूं पडसाद ॥

स्वातंत्र्याविण जगणें आतां जिवंतपणिं मरणें ।
स्वातंत्र्याचया समरीं हांसत ध्येय अतां उसळणें ॥

देह न अमुचा तुझाचि माते ! वाहूं तव चरणीं ।
स्वतंत्र-भारत पाहूं डोळां तळमळ हीच मनीं ॥

# ❁ आव्हानगीत ❁

स्वतंत्रतेची उषासुंदरी उदयगिरीवरि अवतरली ।
स्वातंत्र्याची मंगलगीतें निसर्गकुंजीं दुमदुमलीं ॥

शीत सुगंधित मंद समीरण निसर्गदेवी पसरितसे ।
चैतन्याचा देवाघरचा झरा झुळझुळू वाहतसे ॥

नैराश्याचें नांव लोपलें; आशादेवी स्मित करिते ।
देशभक्तिची स्वयंस्फूर्तिचीं मंगल गाऊंया गीतें ॥

आलस्याची घट्ट बंधनें उसळीसरशीं तोडूंया ।
कर्मयोगिचें रहस्य उमगुनि उन्नतिमार्गा सेवूंया ॥

उत्साहाची एक गर्जना चहूंकडोनी उठताहे ।
प्रसन्नतेची सृष्टीमाजीं प्रभा कोंदुनी उरताहे ॥

स्वातंत्र्यास्तव प्राण वेंचुनि पावन झाले जे वीर ।
धडा तयांचा गिरवायाचा ध्यास मनींचा अनिवार ॥


वीट कवींनों ! अजुनि न आला गाणें गाउनि प्रेमाचें ।
झालें आतां तें रणगाणें, दिव्य गीत गा तेजाचें ॥

होतों आम्ही कोण ! परंतु कोण ! आज ते आहोंत ।
चला वाहवूं वीररसाचा पाट अखंडित काव्यांत ॥

हृदयतंतुचें करुनि तुणतुणें दंग होउं या गानांत ।
लकेर छेडुनि रणकाव्याची स्फूर्ती प्रेरूं राष्ट्रांत ॥

द्वैत छेदुनी ऐक्य भावना चला उपजवूं देशांत ।
खांद्या खांदा भिडवुनि लढणें शिकवूं कार्यक्षेत्रांत ॥

कर्मवीर हें राष्ट्र बनवुनी उदय आणुं या खेंचोनी ।
ठेवूं मागें नांव करोनी स्वतंत्रतेचे कष्टमणी ॥



# —: प्रातर्भूपाळी :—

स्वातंत्र्याची नौबत झडवा तरुणांनो ! भारती ।
सवें रवीच्या उदय होउं द्या जनतेची जागृती ॥

दिशा उजळल्या; निसर्ग फुलला; प्रसन्नता भरली ।
चैतन्याची लहर एकली व्यापुनिया उरली ॥

त्या लहरीच्या स्पर्शें केवळ स्वत्व हृदीं बाणे ।
मंगलकालीं करूं प्रतिज्ञा स्वतंत्र जगीं जगणें ॥

स्वतंत्र बाणा; वृत्ती पौरुष; परम्परा अमुची ।
प्रथा चालवूं मायभूमिच्या समरहुतात्म्यांची ॥

बलसंवर्धन, आत्मप्रबोधन उभयांसह वाढवूं ।
चारित्र्याच्या निर्मलदर्पणिं भारतभू भूषवूं ॥

इथेंच झाला सीताजीवन रघुकुलनंदन राम ।
गीतामुरली इथेंच वाजवि यदुपति मेघश्याम ॥

इंद्रप्रस्थीं पृथ्वीराजा झाला वीराग्रणी ।
शिसोदियाकुलभूषण राणाप्रताप वीरमणी ॥

चितोडगडची सती पद्मिनी रमणी वीरांगना ।
दुर्गावतिचा अजुनि दुमदुमे स्वत्वाचा बाणा ॥

समर्थसेवक महाराष्ट्रिचा समर्थ शिवराय ।
निजबलिदानें स्वधर्मकीर्ती उजळी शिवतनय ॥

धरी हिंदवीस्वराज्यतृष्णा बाजीराव मनीं ।
भाऊ! भाऊ! महाराष्ट्रभू हळहळते अजुनी ॥

पुण्यस्मरणा सती अहिल्या दुमदुमते अजुनी ।
समरदेवता लक्ष्मीबाई झांशीरणरागिणी ।

स्वातंत्र्याच्या रणकुण्डांतिल शेवटची आहुती ।
नानासाहेबांची पडली अमुच्या प्रियभारतीं ॥

लोकमान्य जे राजकारणीं गुरुपदवी ल्याले ।
स्वातंत्र्योन्मुख भारतजनता करुनि अमर झाले ॥

सत्य, अहिंसा, असहकारिता, शांतिधर्मजनिता ।
धन्य महात्मा भूषण झाला जो साऱ्या जगता ॥

मातृभूमिचा अमुच्या उज्वल असला इतिहास ।
तिचेच आह्मी तिच्याकारणीं वाहूं प्राणांस ॥



# —: गणेशोत्सव :—

हा राष्ट्रीयोत्सव बलवन्ताचा कीर्तिवृक्ष फुले ॥
जनकल्याणाविण नच चिन्तन ।
जनतारूपी एक जर्नादन ।
त्या लोकसंग्रहास्तव स्थिरधीनें सत्कार्या रचिले ॥

गाजे गीतारहस्यद्रष्टा ।
लोकमान्यता ख्यात प्रतिष्ठा ।
या उत्सवरूपें स्थितप्रज्ञमुनितेजच हें स्फुरलें ॥

गणरायाचें सांघिकपूजन ।
राजकारणीं प्रभुपदवंदन ।
ती कृती करोनी रामदासवच हृदयीं बिंबविलें ॥

समुदायाचा नाथ गजानन ।
यशविभवाची मूर्ति चिरंतन ।
हा देशभक्तगण आधीं वन्दी श्रद्धाभावबलें ॥

मंगलमूर्ती प्रसाद मिळवुनि ।
स्फूर्ती पौरुष अखण्ड लाभुनि ।
गत भारतभूच्या स्वातंत्र्यातें मिळवूं आत्मबलें ॥

---

## —: दासनवमी :—

आला उदया दासनवमिचा मंगल दिन आला ।
महाराष्ट्रांतिल कोण करंटा ज्ञात न हें ज्याला ? ॥

सावध झाला सावधान वच परिसुनि बटु कोण ।
स्वदेश जागवि ब्रह्मचर्य जो पाळुनि आमरण ॥

लोकसंग्रहास्तव जो चालवि प्रपंच राष्ट्राचा ।
कुणा न ठावा केवळ राणा जो वैराग्याचा ॥

महाराष्ट्र हा अमुचा जेव्हां म्लेंछीं गांजियला ।
गोमातांचा तसा द्विजांचा अलोट छळ झाला ॥

पूज्य देवता यवन तुडवितां फोडी हंबरडा ।
जनता सारी तदा तियेला दिधला कोणि धडा? ॥

यवनांधांचा मद हरण्याला कोण पुढें आला ? ।
स्वराज्यसंजीवनी बोधिली कोणी शिवबाला ? ॥

स्वतंत्रतेची सुधा अह्मांला कोणी पाजियली ? ।
स्वातंत्र्याची ज्योती कोणी सांगा पेटविली ? ॥

महाराष्ट्र हा प्राण सहावा जनता कां वदली ? ।
अशी भावना अमूल्य कोणी सांगा शिकविली ? ॥

‘ होई शिवबा! कर्मवीर तूं ’ बोध कुणी केला ? ।
कोणी ऐसा दुजा पुरुष कां राष्ट्रिय अवतरला ? ॥

स्वातंत्र्याच्या सुकुंकुमाचा तिलक कुणी भरिला ? ।
ह्या देशाच्या भाळीं कोणी मंगलप्रद बोला ? ॥

जनतारूपी प्रभू स्तवाया कोणी शिकवीलें ? ।
देशभक्तिचें ईशभक्तिचें ऐक्य कुणी केलें ? ॥

जनतारूपी त्या अंबेची लाज कुणी धारेली ? ।
सफल मनीशा पुण्यात्म्यानें कोणी हो ! केली ? ॥

राजनीतिचें आह्मां कोणी बाळकडू दिधलें ? ।
भरतभूमिचा कोण महात्मा सांगा तरि कळलें ? ॥

भारतकमलिनि पुण्यात्म्याच्या विकसलि उदयाला ।
स्वातंत्र्याचा परिमल जीचा दिशोदिशीं भरला ॥

स्वातंत्र्याची मनमोहन ही मूर्ति कुणी बोला ? ।
बोला बोला **रामदासगुरु** जयमंगल बोला ॥



## --: स्वातंत्र्य दिन :--

स्वतंत्र मी होणार आधीं स्वतंत्र मी होणार ॥
राष्ट्रसभेच्या स्वातंत्र्याची भेरी नादविणार ।
आह्मी भेरी नादविणार ॥

हिंदनिवासी बन्धूबन्धू देशास्तव लढणार ।
आधीं स्वतंत्र मी होणार ॥

चैतन्याची प्रभाच केवळ कुण्डलिनी स्फुरणार ।
आतां कुण्डलिनी स्फुरणार ॥

आत्मसमर्पण देशकारणीं ठरला हा निर्धार ।
आतां स्वतंत्र मी होणार ॥

आत्मघातकी गृहकलहाला थारा नच देणार ।
आतां थारा नच देणार ॥

देव आमुचा धर्म आमुचा देश आतां असणार ।
आधीं स्वतंत्र मी होणार ॥

नवा मनू मी नवचैतन्यें कवनीं हालविणार ।
आतां कवनीं हालविणार ॥

देशविभूती पूजन आह्मी अखण्ड मनिं करणार ।
आधीं स्वतंत्र मी होणार ॥

स्वातंत्र्याच्या रणीं रंगुनी अमर अह्मी होणार ।
आतां अमर अह्मी होणार ॥

स्वतंत्र माझ्या मायभूमिच्या अंकीं मी मरणार ।
आधीं स्वतंत्र मी होणार ॥

## —: माझी बरची :—

सत्याची जी प्यार सती ।
आणा माझी बरची ती ।
तुटुनि पडाया रिपुवरतीं ।
अधीर झालों द्या मज ती ।
स्वत्व जगीचें ।
नाशायाचें ।
ब्रीद जयांचें ।
रुधिर प्राशण्या नरडीचें ।
स्फुरतें पातें बरचीचें ॥

खून कराया भरदिवसां ।
सजले स्वत्वाचा सहसा ।
घेउनि बुरखा भरजरिचा ।
केवळ पोकळ ज्ञानाचा ।
जना भुलवुनी ।
कार्य साधुनी ।
नरकें लोटुनी ।
पहा खदखदां तें हंसती ।
आणा माझी बरची ती ॥

अंधश्रद्धेची हडळी ।
अंधा ग्रासाया बसली ।
उजळुनि ज्योती ज्ञानाची ।
बरची उपसूं स्वत्वाची ।
स्वत्व स्मरोनी ।
हरहर बोलुनि ।
पुढें सरोनी ।

गाफिलतेचा घन पडदा ।
उसळुनि एकाकीं छेदा ॥

रुढी-चुडेल खवखवली ।
घेत चालली अंध बळी ।
दावुनि अपुली पुराणता ।
अंध बनविते गुणवन्ता ।
डोळस असुनी ।
अंध होउनी ।
दृश्य सोडुनी ।
मागेमागें कां पळती ।
उलट दाविती कां रीती ॥

ध्येय आमुचें साधाया ।
अन्यायांशीं झगडाया ।
धीर देउनि अंधां या ।
नको पुढें कां सरसाया ?
कर्तव्याची ।
गुणवन्ताची ।
जोखिम साची ।
माथीं अमुच्या ती म्हणुनी ।
बरची ठेवू पाजळुनि ॥

जिणें जयांचे परहातीं ।
तिथें सुखाची नच वसती ।
स्वत्व जयांनीं झुगारिलें ।
जिवंत असुनी मृत झाले ।
जगावयाचें ।
झगडुनि साचें ।
ध्येय आमुचें ।

मारूं अथवा मरूं रणीं ।
स्वत्वप्रीती ओतुं मनीं ॥

स्वत्वप्रसारास्तव जनन ।
पटेल हृदयीं ही खूण ।
तळमळ माझ्या आत्म्याची ।
निवेल तेव्हांची साची ।
ओळख पटणें ।
धैर्य बाणणें ।
सौख्य साधणें ।
एकामागुनि एक घडे ।
यांत कधींही खळ न पडे ।

सर्व जगाचा इतिहास ।
हेंच सुचवितो जनतेस ।
स्वत्वीं सौख्याची वसती ।
ह्मणुनि तयास्तव धडपडती ।
स्वत्व ऐकलें ।
जरी उपजलें ।
सौख्य लाधलें ।
धार लावुनि ज्ञानाची ।
चालवुं बरची स्वत्वाची ॥

करुणापर.

४४९६

## "कळणार तुला कुठुनी-गरिबींत काय ती झुरणी"

कळणार तुला कुठुनी—गरिबींत काय ती झुरणी ॥
तूं थोराची लेक एकली ।
श्रीमंतीला सुखावलेली ।
सुखें तुजपुढें वाढुनि ठेलीं ।
कळणार तुला कुठुनी—गरिबींत काय ती झुरणी ॥

तीच जाचणी अन्तःकरणीं ।
दिवस आजचा गेला निघुनी ।
कसा उद्यांचा दिन निभवोनी ।
कनवाळु हरी नेईल—तो एकटा करी परिपाळ ॥

पोटासाठीं दिनभर खपती ।
पोटापुरती तरी न प्राप्ती ।
अर्ध्यापोटीं तसे रहाती ।
काळ असा कष्टाचा—नशिबांत हाय ! गरिबांच्या ॥

पक्वान्नांचें जेवण जेवुनि ।
गाद्यांगिरद्यांवरी लोळुनी ।
नव्या सुखांच्या दंग शोधनीं ।
कळणार अशां कुठुनी—गरिबींत काय ती झुरणी ॥

दीनांच्या जे माना पिळुनी ।
भव्य हवेल्या नित्य उभारुनि ।
दंग विलासीं दिवसयामिनी ।
कळणार अशां कुठुनी--गरिबींत काय ती झुरणी ॥

ऐश्वर्याचा तोरा मिरवुनि ।
विद्वत्तेला हीन लेखुनी ।
श्रीमंती ती घेई हंसुनी ।
ऐश्वर्य परी गरिबांचें–लोळणें धुळीं नशिबीचें ॥

अक्कल ज्याशीं धरी वांकडें ।
श्रीमंताचें पोर शेंबडें ।
मोठ्या मोठ्या गोष्टि बडबडे ।
पोटार्थ मान तुकवोनी--गरिबांस हाय! मनधरणीं ॥


अन्यायाचा घालुनि पाया ।
उंच इमारत ती चढवाया ।
पापाचा वरि कळस कराया ।
जगतांत थोर श्रीमंत–कार्य कां हेंच करितात ॥ ?

अशांचाच परि जन बडीवार ।
करित सारखे आले अजवर ।
सद्दी त्यांची अजून कुठवर ।
कळणार कुणाला ती-काय जे वसे प्रभुचित्तीं ॥

उंबरठा तो नको झिजविणें ।
जीवित असलें लाजिरवाणें ।
मरण यापरी बरवें येणें ।
कुठवरी हरी तरि त्यांचा--त्वद्धेतु अंत बघण्याचा ॥

गुणी जनांची करुनी माती ।
देवांवरती शस्त्र उपसती ।
दानवरूपें जगीं अवतरती ।
छळण्यास काय धनवन्त--लागेल कुठुनिया अन्त ॥

दानव जिकडे तिकडे भरले ।
देवांवरतीं शस्त्र उपसलें ।
नैराश्याचे मेघ दाटले ।
विपरीत अशा या काळीं--गरिबांस एक हरि वाली ॥



## —: शोकसंतर्पण :—

क्रूरा काळा होता तुजला घाला घालायचा ।
क्रूरता कळस करायाचा ॥
भारभूत नर भूला झाले थोडे कां भूवरी ।
हिरा कां उचलुनि नेला परी ॥
असंख्य तारे नभीं विलसती तम साराया परी ।
पाहिजे इंदु नभोभीतरी ॥
हिरा ऐरणीं ठरे एकला
घाव जगाचे सोसायाला ।
समर्थ होता तोच एकला ।
ओढुनि नेतां एकाएकी फुटली किंकाळी ।
हृदया भेदुनिया गेली ॥

जिकडे तिकडे हवाच होता; होता इतुका भला ।
जनातें भूषण तो जाहला ॥
वैर सोडुनि सरस्वतीसह रमा रंगली घरीं ।
सुखाची सीमा झाली जरी ॥
गर्व कशाला ह्मणती त्याला ठाउक नव्हते मुळीं ।
जाहली मूर्ति अशी आगळी ॥
एकैक तयाचे गुण आठवतों ।
चित्र तयाचें जों न काढितों ।
नयनीं अश्रूपूर लोटतो ।
दृष्टी माझी अंधुक करुनी चित्र पुसुनि टाकी ।
उदासी होतों एकाकी ॥

मनीं चित्र जें रंगविलें मीं दिसेल कां तें जगीं ।
वेदना प्रश्न करी जागी ।
विचारलाटा उसळुनि गर्दी देती उडवोनी ।
शून्य मी होतों तेव्हां मनीं ।
विश्वाचा हा थोर पसारा होतो मज शून्य ।
मानसीं राज्य करी शून्य ।
कृष्णरात्रिची कृष्ण काजळी ।
जिकडे तिकडे जणों दाटली ।
सर्व भावना क्षणीं हरपली ।
जग भावाचें भाव लोपतां दृष्टी मम गेली ।
अंधता सर्व जनीं दाटली ॥

बालपणींच्या उंच येवढ्या नसतिल त्याच्या उड्या ।
पताका विजयाच्या लागल्या ॥
जगीं जाहला खरा मोहरा विश्व सकल वदलें ।
जन्मुनी सार्थ जिणें केलें ॥
जगांत येउनि करावयाचें यापरतें राहिलें ।
कळवा काय कुणां कळलें ? ॥
नेत्यांनीं जो मार्ग आंखिला ।
ध्येय जगाचें सर्व जाहला ।
तोच मार्गही तयें गिराविला ।
त्याच्या आत्म्या शांती लाधो देवा ! ही विनती ।
करितों येउनि काकुळती ॥

# —: गतभर्तृका :—

क्रूर काळकरणी बघतां हृदय ये उलून
दैव मारि त्यांना जगतीं सोडवील कोण ? ॥ क्रूर ॥

बसलि बालविधवा कोणी मूक कोपऱ्यांत
पदर लाल डोईवरचा नीट सांवरीत
फुटुनि अश्रु येतां नयनीं धरित आंवरून ॥ क्रूर ॥

चैत्रमासिं दिन येई जो हळदकुंकुवाचा
कोण मोद संसारींच्या हांसऱ्या कळयांचा
परि कोपऱ्यांत पडली कलिका आज ही मलून ॥ क्रूर ॥

युवतिलोट लोटुनि गेलें गेह गजबजून
मधु विनोद थट्टलाही रंग ये भरून
हाय! कोण बसली दुःखी भालिं कर धरून ॥ क्रूर ॥

हळदकुंकु सौभाग्याचा दिन सुवासिनींचा
धन्य भाग्य त्यांचें ज्यांना होय तो सुखाचा
परि हाय ! डोई पडला ज्यांच्या परशु कोसळून ॥ क्रूर ॥

विगतकान्त तिजला कुठुनी सोहळा सुखाचा
हक्क तिजसि एकचि उरला अश्रु ढाळण्याचा
तेहि तिमिरिं एकान्तांत एकली बसून ॥ क्रूर ॥

होरपळुनि येतां हृदयीं कंठ गद्गदून
कोण आज माझे जगतीं येवढें वदून
लोचनांस मिटतां तीनें गळुनि पडत मान ॥ क्रूर ॥

———

# --: गरीबांची कहाणी :--

कथा दारिद्र्याची कुठवर कथूं जो न सहवे ।
बरा वाटे मृत्यू; तळमळ हृदींची न वदवे ॥
खरें सांगू जातां वचन नच माझें परिसती ।
खरें सांगायाची जणु मजसि चोरीच जगतीं ॥

दया दावूं जातां धनिक मज हेटाळुनि हंसे ।
दयेचा कां सांठा सकल धनिकांच्या गृहिं वसे? ॥
दयेचा ओलावा गरिब ह्मणुनी कां लव नसे ॥
गरीबी श्रीमंती प्रभुमनिं कधीं भेद न वसे ॥

कुणी येवो जावो सहज मज टोंचून वदती ।
अरे ! मूर्खा ! मूढा ! धनिक मज नांवें वितरिती ॥
मुक्यानें तें आह्मीं परिसुनि मुकें पूर्ण बनणें ।
दारिद्र्यांच्या भालीं कुजवुनि मना हेंच जगणें! ॥

स्वयें केल्या लीला कुटिल परि डोळें पचविती ।
गरीबांच्या माथां अघ सकलही ते ढकलिती ॥
वसें जें जें पोटीं सकल हृदयातें उकलुनी ।
कुणां सांगू जातां पडति अडवे घात करुनी ॥

दया माया विश्वीं लव न उरली कां प्रभुवरा! ।
जणों स्वार्थासाठीं घडविलि गमे केवळ धरा ॥
अनाथांच्या नाथा ! वितरुनि दया त्यां सुखाविसी ॥
कधीं केव्हां त्यांची कटकट सदाची मिटविशी? ॥

---

# —: निराशेंतील उद्गार :—

ईप्सित वस्तू मम झाली ।
हात तियेला मी घाली ॥
घसरुनि पडलों तों खालीं ।
मनिंची आशा मनिं जिरली ॥
न्याय प्रभूचा ।
अन्यायाचा ।
असेल साचा ।
नशीब लटकें जरि माझें ।
होइल इप्सितही ओझें ॥

तारा नभिंच्या लुकलुकल्या ।
वेडावुनिया जणु हंसल्या ॥
लावायाचें जयीं पिसें ।
तोष मानिती करुनि हंसें ॥
सुखदुःखाचें ।
चक्र जगाचें ।
फिरावयाचें ।
हंसणारे ते हंसतील ।
दांत तयांचे दिसतील ॥

" पडलों झडलों तरि चढलों ।
म्हणुनिच आनंदी गढलों ।
यत्न गड्यांनो ! सोडुं नका ।
बोध न माना हा लटका ।

विचार केला ।
मनीं बिंबला ।
परि ढांसळला !
अपयश हृदयातें जाळीं
शोकसागरा ये उसळी ॥

खोटें माझें तप ठरलें ।
बोल नशीबा मग कसले ? ।
पूर्ण न झालें तप अजुनी ।
येइल ईश्वर कां ह्मणुनी ! ॥
गरगर फिरतें ।
वाऱ्यावरतें ।
झोंके खातें ।
चंचल मन फिरफिरतें ।
न कळे केव्हां स्थिरावतें ? ॥



# भावनापर



चित्रकार—  दि. ग. वैद्य

चैत्रमासिं दिन येई जो हळद कुंकुवाचा  
कोण मोद संसारींच्या हांसऱ्या कळयांचा  
परि कोपऱ्यांत पडली कलिका आज ही मलून !

—गतभर्तृका.



चित्रकार— दि. ग. वैद्य.

''फूल डोईचें पडतां गळुनी
खूण समजुनी करि उचलोनी
तें चुंबचुंबुनी कवळुनि हृदयीं आठवि मूर्ति तिची''

—प्रणयवीर.

# —: हें काय ! :—

( अंतरंग व्यापून टाकणारी व्यक्ति चटका लावून निघून गेली ह्मणजे मन अन्तर्मुख होऊन साहजिकच अनंताच्या अनंतत्वाशीं खिळतें. )

अमरलतेची कलिका फुलली ।
लावण्याची मूस ओतिली ।
दिव्यत्वाची चमके बिजली ।
मोहकतेची—मूर्तिमंत प्रतिमा साची ॥

मृगनयना ती फिरवुनि लोचन ।
मोहनमूर्ती करी विलोकन ।
ललना करिते सृष्टिनिरीक्षण ।
चंचल डोळे—पाहुनिया तपही डोलें ॥

कुटिल केशही मुख निरखाया ।
हळुंच लागती पुढें सराया ।
वरिवरि सारी तया लीलया ।
भुलवी लीला—मूर्तिमंत तपतेजाला ॥

स्मित मधु ओष्ठीं धरुनि कुणाला ? ।
भुलवायाचा प्रयत्न असला ।
कां जगताला हंसवायाला ।
हो सुरबाळी—महीतळीं जणुं आली? ॥

आनंदाच्या रसीं बुडाली ।
आनंदानें सृष्टी खुलली ।
तीच भावना जगतीं उरली ।
मम मोदातें—येतसें मागुती भरतें ॥

व्योमीं तारासंघ विलसला ।
नयनीं तीच्या एक बिंबला ।
हाय ! हाय ! परि तुटोनि पडला ।
कोण कुणाचें!—बोलली कायशी वाचें ॥

टपटप अश्रू गळूं लागले ।
तेज वदनिचें पार लोपलें ।
हाय ! हाय ! हें वच ऐकियलें ।
बघतां खालीं—चेतनाहीन ती दिसली! ॥

मोहकतेचे रंग बदलले ।
भान जिवींचें सर्व हरपलें ।
मोल जिवींचें फोल जाहलें ।
एकाएकीं—चेतना देह कां टाकी? ॥

'मी मी' ह्मणती प्राणी सगळे ।
कार्यकारणीं प्रगूढ खिळलें ।
तत्व कुणाला परी नुमगलें ।
धन्य जो जाणें—अनंत त्याला नमनें ॥

## --: आशा :--

आज निराशा—होईल उद्यां ती आशा ॥
हीच कल्पना मनीं धरोनी ।
जन व्यवहारीं दिवस यामिनी ।
निर्भयतेनें मार्ग आंखुनी ।
आक्रमिताहे--वैचित्र्य जगीं दिसताहे ॥


सुम वेलीचें मनांत ठसलें ।
मारुतभारें गळोनि पडलें ।
मोहक दुसरें पुष्प उमललें ।
आज निराशा--होणार उद्यां ती आशा

उंच गिरीच्या शिखरावरुनी ।
पडीत नर जरि पद घसरोनी ।
यत्न पुनरपी कां दिनरजनी ।
आज निराशा--होईल उद्यां ती आशा ॥

बाळ जननिचा ज्वरें पोडिला ।
औषध पाजुनि निजवी त्याला ।
चुंबुनि ओती जणुं प्राणाला ।
आज निराशा—होईल उद्यां ती आशा ॥

भूलोकींचें तुटतां नातें ।
आशा अंतरिं दुजें जुळवितें ।
अविनाशी हें प्रेम बोलतें ।
आज निराशा—होईल उद्यां ती आशा ॥

ही आशेची दिव्य सांखळी ।
देवलोकहि आणी खालीं ।
अतर्क्य हीची लीला असली ।
आशादेवी !—शिरसि वरदकर ठेवीं ॥



## —:माझा ईश्वर:—

ईश जगीं जो गाजतसे
अमुच्याहुनि कां भिन्न असे
नारायण जग करणीनें
वदतें जग कां मूढपणें?
हृदय जगाचें
हलवायाचें
भाग्य जयाचें
पुण्यवंत तो हरि आहे
नारायण कां नर नोहे? ॥

सद्भावांची जे मूर्ती
तीच तीच हो प्रभुमूर्ती
आत्मस्तुति कां भाव खरा
हृदयाला जा पुसा जरा
धडकी भरते
धडधड उडतें
कुंठित होतें
नकाररूपीं घुमघुमतें
उत्तर याचें कणीं तें ॥

सद्भावांचा जो पुतळा
आत्मश्लाघा विष त्याला
स्तुती कराया ईश कदा
उपदेशिल कां जगा वदा ।
स्तुती तराची
सद्भावांची
थट्टा साची

परमेशाची ती निंदा
निंदा मजला वा वंदा

स्तुतींत नोहे प्रभुसेवा
प्रकाश दावी हृदयदिवा
येथुनि तेथुनी एक असे
ज्योत हृदीं जी तेवतसे
सद्भावाची
चिर सत्याची
दिव्यत्वाची
अमोल ठेवा सांठविला
कृतींत ईशाचा सगळा ॥

वचनीं केवळ लय झाला
बल ना उरलें कार्याला
स्फूर्ति काय ती कामाची
प्रौढी पोकळ ती साची
ध्येय ठेवुनी
निरंतर मनीं
तसें वागुनी
कर्तव्याची कांस धरूं
ईशपदातें चला वरूं ॥

[ " वैर तयाला–गरिबी जे शिकवितात बालास " ]

—केशवसुत.

## —: खुळी कल्पना :—

असेन कैसा मी भोळा
दिसतो ह्मणुनि काय खुळा ?
दिसतें तितुकें सत्य जरी
कोण जगाची भीति धरी
मूर्ति सांवळी
जरी बावळी
असे वेगळी
खोल खोल ती हृत्पटलीं
गांठ आंतली दडलेली ॥

हृदयें होतीं लग्न किती
गांठ किती परि सोडविती ?
मधुर भाषणें परिसुनिया
जाती सहजीं हुरळुनिया
भुरळ जगाला
पाडायाला
जन्म जाहला
ज्या कृत्तेचा तिज नांव
स्वत्व-भावना-आभाव

" कुठला शेजारचा हरी
असे दांडगा तो भारी
केल्या त्याची खोडि कुणी
थप्पड देइ लगावुनि

जमावयाचें
अशांत कैचें
मम बाळाचें
गरीब माझें बाळ गुणी
मारी नच तें उलटोनी

" हात पाय तूं तोडोनी
घेशिल बाळा ! खेळोनी
आजवरी कां खेळोनी
भरलें आहे पोट कुणी ?
धडा आपुला
शंभर वेळा
घोंक चांगला
खेळ सर्वही सोडोनी
विद्या घेई तूं शिकुनी ॥

गोड गोड हे वच दिसती
विषाहुनीही कटु असती
वच वदतांना सुख वाटे
परि भरतांना ऊर फुटे
असती कांरे
झळझळणारे
लोलच सारे
अंकुर हृदयीं स्वत्वाचे
घाला त्यावरि वच साचे

वच वदतांना हे दुबळे
जीभ तयांची कां न गळे ?
शेखी मिरवाया अपुली
सनद तयांना कुणी दिली ?

कळे न त्यांना
स्वत्वभावना
काय कल्पना ?
असतिल घरचे ढढण्णा
दिमाख त्यांचा खुळेपणा ? ॥

धाडस नोहे खेळांत
खेळ कशाचे ते होत ?
खेळांचे गुण वगळं नी
काय करावें खेळोनी
संसाराचा
खेळच साचा
या जगताचा
हरकत मजला वदण्याला
छाती आहे कोणाला ?

अन्तःकरणीं शिरावया
गूढ तेथलें उकलाया
फेकाफेकी गोफणिची
भेरी अथवा तुतारिची
प्रकाश द्याया
जगताला या
गा कविराया
गुलामगिरिचें रोंगण तें
धुवुनि काढण्या बल ज्यातें ॥

---

## ❀ विश्वप्रेमाची भूल ❀

कुटुम्ब ह्मणती जग सगळें
मी तों ह्मणतों त्यांस खुळें
माझें मीपण जरि सरलें
व्याप जिवींचे मग फिटले
भावाभावीं
प्रीती विश्वीं
कशी वसावी
पोकळ विश्वप्रेमाचा
आव नसे कां हा साचा ॥

निजहित ज्यांना कळेचिना
परहित साधें कां त्यांना ?
निजनयनीं जरि मुसळ वसे
निजनयनातें तें न दिसे
कुसळ परांचें
नयनीं साचें
भरावयाचें
अपुलें सोडुनि परक्यांचें
वेड नसे कां बघण्याचें ॥

आधीं आत्मोद्धार करूं
परकल्याणीं पुढें सरूं
आधीं अमुचें घर पाहूं
नंतर परचिंता वाहूं

शोधूं अमुचा
पथ उन्नतिचा
या जगतींचा
निर्णय अमुचा करावया
परमुख नलगे पहावया ॥

तत्व केधवां बिंबेल
आचरणीं तें उतरेल
ठेवुनि धर्मी विश्वास
कर्तव्याचो धरि कांस
स्थिति जाणुनी
हिंमत धरुनी
झुंज झुंजुनी
येइल नर जो जगापुढें
गाइन त्याचे पोवाडे ॥

भुलती वरच्या झांकीला
गाळ बुडीं परि दडलेला
पटल सारुनी वरवरचें
अंतःकरणीं शिरण्याचें
गूढ उकलुनी
विचार करुनी
मार्ग आंखुनी
पुढेंच पाउल टाकूंया
उन्नतिमार्गा सेवूंया॥

निसर्गकुंजीं वनदेवी
आत्मोन्नतिचा पर्व ठरवी
नभोवितानीं तारांनीं
मार्ग घेतला आंखोनी

ज्ञेय जगाचें
ह्या तत्वाचें
मण्डन साचें
स्वयेंच निर्णय करण्याचा
स्वभावधर्म प्राण्यांचा ॥



# वायूंत तरंगणारे बोल !

नाश वस्तूचा पूर्ण जाहलेला ।
आजवरिही कोणी न ऐकियेला ॥
कार्य करुनी तत्वांत तत्व जातें ।
नेणताती हें तत्व तत्ववेत्ते ॥

राष्ट्रधर्माचे बोल निघुनि गेले ।
नाद घुमवुनि वायूंत लीन झाले ॥
किती गेले; जातील; नित्य जाती ।
परी त्यांची कोणास असे भ्रांती ॥

राष्ट्रयुद्धाचा नाद गर्जताहे ।
यशोदुंदुभिही अजुनि दुमत राहे ॥
हाय ! भालीं परि लेख बधिरतेचा ।
कुठुनि झुंझाया धीर यावयाचा ? ॥

कुसुमगंधानिल मंद पसरताहे ।
सर्वे संतांचे बोल आणिताहे ॥
सकल विश्वीं उत्साह भरायाला ।
संतसंगानें गंध तयां आला ॥

राष्ट्रवीरांचें स्फूर्तिरूप बोल ।
कुठुनि माझ्या हृदयांत उतरतील ? ॥
त्याच बोलांची आज मला खंती ।
कोण माझी छेदील बधिरता ती ? ॥

अजुनि संजीवनि तरत नभीं राहे ।
कोण काढाया तसि बली आहे ? ॥
सार घेउनि निःसार टाकण्यास ।
कधीं आह्मां लाभेल राजहंस ? ॥

[ ध्यास तो भास ]

## --: झोला :--

आलें माझ्या मनीं एकदां जावें चढुनी स्वर्गाला ।
टांच मारुनी वसुंधरेला झोला वरतीं चढवीला ॥

दोन अंगुले स्वर्ग राहिला गेला इतका झोला ।
आशारूपी उंच मनोरा एकाएकीं कोसळला ॥

दृश्य पाहतां भान विसरलों कर झोल्याचा मम सुटला ।
स्वर्ग सोडुनी महीतळाला कैसा आलों गूढ मला ॥

सुरलोकींच्या सुरसुमनांच्या माला घेउनि सुरबाला ।
ईर्ष्या दिसली त्यांची मजला माला अर्पण करण्याला ॥

धर्मरज्जुला घट्ट धरोनी संसाराच्या आंदोलीं ।
एकवार मी पुनरपि चढलों घालुनि धरणी पादतळीं ॥

परंतु आला झोला खालीं ध्येय न हातां सांपडलें ।
वरतीं खालीं कितिदां गेलों भान न त्याचें मज उरलें ॥

मज स्वर्गाचें स्वर्गीं माझें वेड लागलें कां न कळे ।
होतां माझी एकतानता सहजीं लोचनही मिटलें ॥

झोला माझा कदा थांबला कळलें नाहीं मुळीं मला ।
नेत्र उघडतां माझें मजला दृश्य लागलें हातांला ॥

प्रेमतरूंची जिकडे तिकडे सुमनें गेलीं विकसोनी ।
अखण्ड त्यांचा दिशांदिशांना परिमल गेला दरवळुनी ॥

त्या प्रेमानें प्रेमरूप मी परमेशाला अळवीन ।
चिन्मय हरिच्या पदारविंदीं विलीन अंतीं होईन ॥

## --: प्रेम :--

जीवन प्रेमाविण खोटें
कानीं नाद असा उमटे
अनुभव माझा जगताचा
प्रत्यय पटवी सत्याचा
मांगल्याचें
मोहकतेचें
चिर सत्याचें
स्फूर्तीचें मम निधान तें
हृदयिं चेतना ओती तें ॥

कमलकोमल स्त्री-हृदया
घाव भवाचे सोसाया
समर्थ करिते जी लीला
उगम तियेचा त्याच स्थलां
परमेशाचें
तें रमण्याचें
स्थान सुखाचें
नाजुक तंतू प्रेमाचा
भाव उपजवी आशेचा ॥

प्रेम नासतां निःसार
विश्व सकल हें कांतार
सार न उरला सांगाया
आत्मा लागे भटकाया
भाव प्रभूचा
भव रचनेचा
उकलायाचा

यत्न सारखा चालवितों
कुंठित मति मी परि होतों ॥

भावस्वरूपीं बनलेला
मायारूपीं नटलेला
गोल जगाचा फिरवितसे
चालक याचा कोण असे ?
विचार पुसतो
मनिं जो वसतो
निगर्व होतो
खोल खोल जों मी शिरतों
आशेवरतीं तरंगतों ॥

सारसार जें दुमदुमलें
असेल यांतचि सांठविलें
ईश्वर माझ्या हृदयींचा
झराच संतत प्रेमाचा
झुळझुळ वाहुनी
दिव्य गायनीं
डुलवुनि धरणी
ओघ सारखा वाहतसे
भारुनि हृदया टाकितसे ॥



# सोडुनि मर्यादा सगळे. असति भिकेचे डोहाळे!

स्वैरपणा जरि स्वतंत्रता
कोण तिच्यास्तव मग झुरतां ?
मर्यादा गुण मोलाचा
दर्शक अमुच्या सौख्याचा
सोडुनि मर्यादा सगळे
असति भिकेचे डोहाळे ॥

चव जिभलीला तें खाणें;
मनास येइल तें बकणें;
पडलें पायीं तुडवीणें;
शहाणपणाचें कां करणें?
घालिन मर्यादा त्यांना
नेतिल मजला सुखसदना ॥

नांव 'सुधारक' हें वाया
स्वैरपणानें वागाया
स्वैरपणाचें पोतेरें
फिरवुनि केलें मातेरें
घालुनि मर्यादा अजुनी
सार्थ दाखवा तें करुनी ॥

घरचा राजा जरि होणें
अमर्याद कां आचरणें
आश्रित झाले कां म्हणुनी
हुकुमत घ्यावी गाजवुनी
सोडुनि मर्यादा क्रमणें
खांच पडायास्तव खणणें ॥

उंच उंच खग नभीं उडे
अंतीं खालीं गळुनि पडे
बळ नुमजोनी आचरणें
लिहिलें भालीं हळहळणें
मऊ लागली जरि माती
कोण ढोपरीं ती खणिती ? ॥



## —: प्रणयदेवतेस :—

प्रणयदेवताविरहकल्पना शरसम हृदयीं शिरे ।
सारखी चरचर आशा चिरे ॥
या हृदयीं जी अखण्ड प्रतिमा आहे मीं कोरिली ।
निराशा फाशी तिज काजळी ॥
हृदयदेवते! या जीवाचें जीवन तूं एकली ।
दर्शनीं आशा मम गुंतली ॥
असह कल्पना! असह वेदना! जीवित हें पोकळी ।
सुखशशी हाता येना मुळीं ॥
हृदय सारखें भडभडुनी मम येतसें ॥
जग मज सगळें शून्य सखे! दिसतसें ।
वण वण जगतीं फिरतों लागुनि पिसें ॥
अन्त यावरी किती पाहसी हृदयेश्वरि! बोल ।
करशिल कुठवर माझा छळ ॥
हृदयविदारण न घडो अन्तीं ह्मणुनि तरी ये त्वरें ।
स्वर्सुखां सेवूं प्रेमभरें ॥

———

## ....: भावला :....

गोरा गोरापान–केतकीचें पान
बाहुलीला माझ्या नवरा–शोधिन फारच छान ॥

भुंवया कमानदार–डोळे पाणीदार
जणों बर्फ घांसून केले–दांत छान छान ॥

भव्य भालाचा–कुरळया केशाचा
केशराचें गंध त्याला–लाविन मी रेखून ॥

धोतर जरतारी–पगडी पूणेरी
डौलदार चाले जैसा–कोंबडा अरवून ॥

कांती देहाची–लाली ओंठाची
कानीं चौकडा टपोरा–खुलेल झळकून ॥

मूठ चांदीची–काठी रंगाची
मन्‌गटांत सोनीयाचें–घड्याळ बांधिन छान ॥

अचाट बुद्धीचा–कोंवळया मनाचा
गोड गोड साखरपारा–बोलेल हंसून ॥

लाडीगोडीनें--खेळीमेळीनें
मिळून मिसळुनि बाहूलीचें--घेइल मन ओढून ॥
ऐसा बाहुलीला माझ्या--नवरा शोधीन छान ॥गोरा०॥

———

( ही निष्प्रेम संसाराला विटलेली असून परमेश्वराच्या ठिकाणीं चित्ताचा लय करीत आहे. )

# ....विरागिणी !....

कैसी कोणा कोणा सांगू–करुणा कहाणी ॥
अश्रू सुकतील–काळिज करपेल
कण्ठाखालीं हृद्गत सारें–जाई वितळोनी ॥

हृदयीं भेसूर–उठलें काहूर
दाट निराशा जिकडे तिकडे–गेली पसरोनी ॥

बोल न मायेचा–तंतु न प्रेमाचा
अन्तरींची आशाज्योती–गेली मालवुनी ॥

देणें दैवाचें–लेणें जीवाचें
संसारीं या व्हावें कैसें–प्रेमावांचोनी ॥

मायामोहाचें–जग हें स्वार्थाचें
प्रेमनिर्झर परमेशाचा–तेथें कोठोनी ॥

विसरुनि गणगोत–एकच मज छंद
मूळमाहेरासाठीं मी वाट पाहोनी ॥

एकच संबंधी–तोच संबोधी
जीवीं जीव घालुनि तूं मी–टाकिन बुडवूनी ॥

[ हृदयांत एकवार बिंब उमटलें कीं तें कायमचेंच. ]

## —: अढळ प्रतिमा :—

सरिताहृदयीं बिंब इंदुचें
एकवार जें उमटे साचें
कुणा कधीं कां पुसावयाचें
जललहरीचा तें पुसण्याचा-शीण न कां वाया ? ॥

प्रेमळ वचनीं आशा लावुनि
हृत्पुष्पातें प्रेमासॅचनीं
पूर्णांशानें विकास करुनी
चुरमळुनी त्या टाकायाचा-शीण अतां वाया ! ॥

तुजसि न कळतां गेलें उमटुनि
बिंब कुणाचें हृदयदर्पणीं
अन्तर्लोचनिं पहा उघडुनि
बिंबवंचना करायाचा-हट्ट तुझा वाया ! ॥

तूं माझी मी तुझाच आतां
दोन जिवाची एकतानता
प्रेमानंदीं एकच असतां
द्वैतकली कां तोंच हृदीं तव-लागे नाचाया ? ॥

कटु शद्बांची बरची करुनी
हृन्मर्मावरि घाव घालुनि
परिहासाचें जहर ओतुनी
हंससी तरिही ह्मणेन तुजला-माझी ह्मणवाया ॥

कालौघाची अघटित लीला
सामावुनि हृदीं गतकालाला
जीव पालवी कोमजलेला
दुःखी जिवां पुनरपि सुखवी-प्रेमा सिंचुनिया

लौकिकबंधन या जगतीचें
ऐक्य साधण्या दोन जिवांचें
ह्या देहीं जरि बाधक साचें
नवदेहीं परि पूर्णांशानें-मीलन लाहूंया ॥



[ "प्रभुकृती रुचिर सारी, नवल भारी" ]

—आनंदराव टेकाडे

## ....: गूढ :....

या चिद्ब्रह्मांडीं भरुनी उरलें गूढ कुणा कळणार ?
भाववीची उसळताती
मुखसरोजीं उमटताती
त्या हृदयान्तरिंच्या गूढ भावना कोणां आकळणार ?

निसर्गासही हृदयभावना
प्रत्यय येतो तो नटतांना
परि दृग्गोचरता दिव्य दृष्टिविण कोणाला येणार?

शीत सुगंधित अनिल वाहतो
जनमनक्लेशा संहारीतो
ती दिव्य शतिता बद्ध कराया वच अपुरें पडणार ?

नटुनि थटुनि मोहणारी
नवनवीना विकसणारी
तीं निसर्गरमणी श्रृंगारश्री कवनिं कुणा वठणार ?

नादविविधता गर्जे जगतीं
नादब्रह्मीं विलीन होती
त्या नादब्रह्मा आकळण्याचें बल कोणां असणार ?

त्रिगुणरूपें विश्व नटलें
करुनि त्यातें वेगळालें
तो धर्म तयांचा उकलायाची शक्ति कुणा असणार ?

तरल प्रतिभा दिव्यतेचें
शारदेच्या संपदेचें
तें भावचित्र कां हृदयस्पर्शी वचनिं कुणा वठणार ?

कुठुनि कोठें मजसि जाणें
काय जगतीं साध्य करणें
त्या सूत्रचालकें धरिला हेतू काय मनीं असणार ?

हृदयान्तरिंची ज्योत उजळुनी
अद्वैताचें तत्व जाणुनी
तो चैतन्याचा चिर झरणारा निर्झर आकळणार.



## : साहुं कशी विरहास :

चित्तचकोरा! मत्प्राणेशा! साहुं कशी विरहास

निसर्गकुंजीं विहंगकूजन
मोहक मंजुळ निर्झरगायन
शीत सुगंधित मंद समीरण
चित्त पोळवी अधिकच माझें—साहुं कशी विरहास

वसंत वैभव सर्वें घेउनी
उन्मादाचें अस्त्र फेकुनी
अनंग आला चाप सज्जुनी
बावरलें मी हृदयीं नाथा! साहुं कशी विरहास

जिवित एकाचे देह निराळा
असे कितीकदां मजला वदला
वच इतक्यांतचि काय विसरलां
मीन जळाविण जीव तसा ही—साहुं कशी विरहास

होइल नाथा! केव्हां भेटी
असतांना मज मीच एकटी
नयनीं अश्रू करिती दाटी
अश्रू पुसाया तुह्मि नसतांना—साहुं कशी विरहास

चिन्ता कांहीं धरुनी वाया
विचार त्यांवर करकरुनीया
शिणवावे किति या मम हृदया
ह्मणोनि धरिलें केवि मनि हें—साहुं कशी विरहास

निजदासीला रिझवायाला
काव्य कराया असाल बसलां
असाल त्यांतचि भान विसरलां
'तुझाच मी गे' कळवा मजला—साहिन मी विरहास



[ कॉलेजांतील विशिष्ट वातावरणांत वाढलेले तरुण विद्यार्थीच यांतील ]
[ मर्म आणू शकतील. ]

## —० प्रणयपीर ०—

जगिं ललनालीला आत्मवंचना करिते तरुणांचीं

यौवन देहीं ओसंडोनी
मुग्धमधुरता नाचे नयनीं
ही निसर्गकलिका अर्धविकसली नवलावण्याची

प्रणयिजनांचें आतुर अंतर
सहजविलोकन करितें कातर
मज प्रसन्न ललना जो तो ह्मणुनी हांव धरी तीची

फूल डोइचें पडतां गळुनी
खूण समजुनी करि उचलोनी
तें चुंबचुंबनी कवळुनि हृदयीं आठवि मूर्ति तिची ॥

मुरडुनि मागें वसन सांवरी
प्रणयपीर हा हुरळुनि अंतरिं
त्या दिवसयामिनी हुरहुर हृदयीं ललना स्नेहाची

वायुवशानें पदर सरकतां
नीट तयातें ती सांवरिता
निज भान भुलोनी भिरभिर पाहे मूर्ती ललनेची ॥

मिसूर ओष्ठीं प्रणय अंतरीं
येती उदया एक अवसरीं
हा निरंकुशगडी ललनाजीवी रिझवी जवासी ॥

प्रणयावांचुनि जिणें जगींचें
जगणें ह्मणुनि जगावयाचें
जगिं माळ गुंफणें ध्यास हाच या प्रणय तरंगांची ॥

स्वैरविहारी जयास गोडी
शब्दशूर हा वीर बेगडी
मुळिं न जयावर बंध कुणाचा कदर न कोणाची ॥

हृदय तिच्यावरिं माझें जडलें
तिचेंच मजवरि आतां उरलें
मम कार्य जाहलें अर्धें ह्मणतों धन्य असो त्याची ॥

प्रबल विकारीं विचार लोपे
कुसुमशराहीं अन्तर तापें
ती बळें ओढवुनि आग घेतली कधिं न शमायाची ॥



## —॰ अहंकार ! ॰—

तरि आत्मप्रौढी-मोह कुणाला आहे सुटलेला
माझें कसलें काय वदोनी
स्वयेंच घेई ओवाळोनी
ही जीवितगुटिका या भुवनींची विदित न कोणाला ?

स्वयंप्रकाशें सहस्ररश्मी
प्रकाशवुनि जग तळपे व्योमीं
परि सूर्याभंवतीं मिरवुनि धरणी दावी विभवाला ॥

सुधांशुसागर इन्दु नभींचा
दिव्य मोहरा धवल यशाचा
परि क्षुद्र तारका लुकलुकुनीया दाविति वदनाला ॥

विधुहुनि सुंदर स्वतः लेखुनी
सायंतारा घेई मिरवुनि
परि धवला जोत्स्ना विधुची मिळणें शक्य कसे तिजला?॥

प्रसन्न वागीश्वरी दुज्याला
स्तुती कराया कुणी लागला
" निज बाडीं बहुतचि आळविलें मीं कविता देवीला"॥

अमोघ शक्ती कुठें पाहुनी
पूर्व पराक्रम निज सांगोनी
ते तुच्छ लेखुनी वाजवितातीं आपुल्या टिमकीला ॥

अन्तर्गाभा सौंदर्याचा
विलास केवल लावण्याचा
ते नवल न वदती तारुण्याचा खेळच हा सगळा ॥

पदार्थ झाला रुचिकर ऐकुनि
व्यंजन केवळ त्याचें कारण
हा बोल सदाचा वदनीं आहे त्याच्या खिळलेला ॥

सुंदरतेचें सार ओतितां
निसर्ग धर्मचि असे तत्वतां
हें सहजीं वदुनी वरी रसिकवर ह्मणवी अपुल्याला ॥

धन्य प्रतिष्ठा ! धन्य रसिकता !
धन्य अशाची ती वाक्पटुता !
ती अखण्ड लाभो जीवितगुटिका अशाच रसिकाला ॥



## .... मायाबन्ध ....

हें भवमदिराविष पिउनि पिणारा तांडव स्वैर करी
धन सुत दारा माझी माझी
जीव गुंतला मायापाशीं
निजमरण ठेपलें पाहुनि डोळां आशा हांव धरी

स्वतंत्र असुनी मी या जगतीं
व्याप वाढला सारा भंवतीं
परि एकलाच मी पाश छेदुनी चिद्रूपास वरी ॥

भवसुखदुःखें उनसांवली
तरि हृदयाशा विणुनी जाळी
ती नित्य नवनवीं बांधुनि जीवा बुद्धिभ्रंश करी ॥

संमोहाचा निरास करूनी
अन्तर्ज्योती प्रज्वलवोनी
तरि तोच नियन्ता भवपथिं भरला तिमिर निरास करी ॥

मदिरा होउनि स्वयं मधुसुधा
अमरपुरीही बनवुनि वसुधा
मज तोच नियन्ता चिदानंदसुख याच भुवीं वितरी ॥



चित्रकार— दि. ग. वैद्य.

“प्रसन्न वागीश्वरी दुज्याला
स्तुती कराया कुणी लागला
‘निजबाडीं बहुतचि आळविलें मीं कविता देवीला”

—अहंकार.




चित्रकार　　　　　　　　　　　　　　　　　　दि. ग. वैद्य.

"ही हादरीतभू आली अभिनव महिषासुरमर्दिनी"

—अभिनव महिषासुरमार्दिनी

# कळी उमलावी-रसिकता मुदें डोलावी.

कळी उमलावी–रसिकता मुदें डोलावी
रसीं विरोनी समरस व्हावें
विविध तरंगीं स्वैर डुलावें
आनंदाचें सौख्य लुटावें
कळी उमलावी–रसिकता मुदें डोलावी ॥

अरुणरक्तिमा नभा रंगवी
निसर्गरमणी पुलकित व्हावी
लावण्यानें तनु बहरावी
कळी उमलावी–रसिकता मुदें डोलावी ॥

तरलतरलशी अनंगलीला
सहज विकसवी श्रृंगाराला
रमणिरम्यता फुलवि विलोला
कळी उमलावी–रसिकता मुदें डोलावी ॥

सहज करांगुलि केशीं फिरवुनि
हंसूनि उडवुनि पदरां चावुनि
लिही भूमिवरि चरणनखांनीं
कळी उमलावी–रसिकता मुदें डोलावी ॥

नवनव मोहक चंचल लीला
विरघळवोनी प्रणयिजनांला
धुंदी चढते विलासिनीला
कळी उमलावी–रसिकता मुदें डोलावी ॥

[आदर्श राष्ट्रपुरुष ?]

## -: राष्ट्रात्मा :-

त्या सच्चिदानंदघनसत्यस्वरूपीं जीवन विरवीणें
ध्यास जयाला हाच लागला
जीवनमुक्ता बांधायाला
तरि बन्ध त्रिभुवनीं शक्त कोणता कळलें तरि कथणें॥

सुमनें वेंचुनि मालागुंफन
हृदयदेवता अखण्डपूजन
तो कर्मयोगपथ, ध्येयीं ठरलें मन केंद्रित करणें ॥

वर्ण न, गंध न, फुलें सुकावीं
माला सुरुचिर परि गुम्फावी
नित जगन्मंगलीं अनन्यभावें अहि त्या झटणें ॥

जयाऽजयाची लवहि न खंती
अचल श्रद्धा कार्यावरतीं
त्या ध्यास एकला अखण्ड वेंचुनि सुममाला ग्रथणें॥

सुरुचिरमाला अन्तीं गुंफुनि
क्रांती आणिल तोच घडवुनी
मग नवअवतारीं हंसविल, डुलविल भुवनींचीं सुमनें॥

[ तद्धाम परमं मम । ]

—गीता.

## ....: परंधाम :....

तूं माझा मीहि तुझा द्वैत संपलें
चिद्रूपीं मायेचें तिमिर आटलें
द्वैत करी संसृतिच्या मंजु गुंजना
कोणाचा कोण कसा व्यर्थ कल्पना
स्वस्वरुपीं विरताती विविध भावना
परि सगुणरूप भक्तसख्या! दावि सावळें ॥तू माझा०॥

हेम एक विविध अलकारिं कोंदतें
भ्रमबुद्बुदवीचि परी जलविकार ते
भावमणी विविध एक सूत्र गोंवितें
तरलसूत्र मम हृदयीं तेंच ओविलें ॥तू माझा०॥

उत्पत्तिस्थितिलयही जेथुनी स्फुरे
संमोहभ्रमपट जें छेदुनी उरें
धाम तेंच चिरसौख्यद एकलें खरें
अंतरिं मम चिर तेंच परंधाम बाणलें ॥तूं माझा०॥

# —: अनंत :—

आकाशाच्या त्या टोंकाला
कोणी आहे कां हो गेला ?
रंग ह्मणतां त्याचा नीळा
कोणी कैसा आकळीला ? ॥

रंग नसतां रंगारोप
निर्गुणासी सगुणरूप
देउनि होती एकरूप
ज्ञानाचें कां हें स्वरूप ?॥

दृष्टीअन्त जेथें सरे
नीलरंगीं नटतें सारें
अनंताचा रंग नीळा
ह्मणुनि कां हो कल्पीयेला ? ॥

अनंताचें हें केव्हाचें
द्वार खुलें कपाटाचें
गूढ दिव्य अनंताचें
ज्ञानमोती शोधायाचे ॥

वलय रंगीं त्या तेजाचें
काय आहे स्फुरायाचें ?
रंगीं रंगुनि रंगातीत
तेथें बैसे कां अनंत ? ॥

निजजन्माचें चोज होउनी
भीड दृष्टीची चेपोनी
दिव्यरूप डोळे भरूनी
देशी अनंता कां पाहोनी ? ॥



४४९६

## -:- असहयोगिनी -:-

स्फुरणारी चिर आत्मिक तेजें कुंडलिनी माता !
सत्य, अहिंसा, शांति त्रिविधा जीची जयगीता ॥

रिपुहनना नच, रिपुदमना नच हृद्रिपु जिंकाया ।
विजयशालिनी निर्भयवृत्ती अखण्ड बाणाया ॥

प्रभावशाली अस्त्र आगळें सत्याग्रहरूपी ।
अभिमंत्रोनी विजयपताका त्रिभुवनीं जी व्यापी ॥

मंथुनि तत्वार्णव कौस्तुभमणि काढुनि जी घेई ।
कृपाकटाक्षें भक्त जियेचा मृत्युंजय होई ॥

द्वेष प्रेमें जिंकायातें भक्तगणा शिकवी ।
आत्मोन्नतिनें जगदुद्धारां मानवता स्फुरवी ॥

ती सत्याग्रह देवता
आह्मी सर्वथा
नमुनिया अतां
शारीरबलाहुनी बली
नवशक्ति दिव्य आगळी
जी विश्वमंगला सजली
सत्य, अहिंसा, शांति त्रिविधा जीची जय गीता ॥स्फुरणारी॥

# इतर

## —क्रीडांगण—

Be it a weakness it deserves some praise
We love the play-place of our early days
The mind leaps not & the heart is stone
Who feels not and feels at none.

वाटो दुर्बलता कुणां परि दिसें तें स्तुत्य मातें निकें ।
क्रीडास्थान तसेंच बाळपणिचें आह्मां असें लाडकें ॥
ज्यांची वृत्ति नुचंबळे बघुनिया हें दृश्यही गोजिरें ।
त्यांचें प्रस्तररूप अन्तर कधीं केव्हांच ना पाझरें ॥

[ श्री० यशवंत रामचंद्र ओक यांची कन्या चि० लीलावती हिच्या लग्नानिमित्त अभिष्टचिंतन. ]

## -:- शुभाशीर्वाद -:-

श्रीमन्मंगलनायका नमुनियां प्रार्थीतसे आजला, ।
कार्यां येउनियां कृपामृतभरें न्या कार्य हें सिद्धिला ॥
होवो मंगल हा विवाह जगतीं आदर्श दोन्ही कुलां ।
लीला-राम–वधूवरीं समसमा संयोग हा जाहला! ॥१॥

लाभे जो यशवंत त्यास असली कन्या गुणें आगळी, ।
लीला ओककुळीं तशी गुणवती विद्यान्विता शोभली ॥
लीले ! तूं श्वशुरगृहीं कुलवधूकीर्तीस सम्पादुनी, ।
होवो भूषणभूत सर्व उभयां धन्या तुझी राहणी ! ॥२॥

देऊनी वडिलांस मान धरुनी शालीनता अंतरीं, ।
सानांचें पुरवूनि कोड मनींचें कौतूक त्यांचें करी ॥
'आलें मी,' 'करिते' तसेंच वदनीं 'नाहीं' नसावें कदा, ।
सौजन्यें मधुभाषणें परिजनां संतुष्ट ठेवीं सदा ! ॥३॥


जें जें आवडतें पतीस अपुल्या तें सर्वही जाणुनी, ।
चातुर्यादिगुणें प्रसन्न करणें अत्यादरें वागुनी; ॥
साधी ठेवुनि राहणी निशिदिनीं तूं आचरीं सत्कृती, ।
राखावें मन तें कसें स्वपतिचें आर्यस्त्रिया जाणती ! ॥४॥

नाहीं, दैवत अन्य थोर जगतीं मातेहुनि प्रेमळ, ।
आशीर्वाद तिचा तुझ्यास्तव सदा सद्भाग्य सम्पादिल; ॥
माता सद्गुणशालिनी स्मरुनियां कार्यांस आरंभिणें, ।
साधा हा सुखमंत्र काय तुजला आह्मीं तरी सांगणें! ॥५॥

जीनें पोसुनि देह हा जगविला ती मायभूमी ह्मणे, ।
"माझें सत्व तुझ्या करींच तरुणा! आहे अतां राखणें;"॥
बोलांची स्मृति वागवूनि हृदयीं तूं आचरीं सत्कृती, ।
आहे आर्य परम्परा जगविणें जन्मोनि या भारतीं! ॥६॥

पूर्वीचें अवहेलुनि सकलही स्वच्छंद ना वर्तणें, ।
युक्तायुक्त पुरें मनीं ठरवुनी कार्यास आरंभिणें; ॥
राखोनी निज संस्कृती तिजवरीं रत्नें नवीं घालणें, ।
हें तों भारतकन्यकांस नलगे आतां नवें सांगणें! ॥७॥

व्हावा मंगल हा विवाह ह्मणुनि इच्छा मनीं चिंतुनी, ।
ब्रह्मवृंद! तुह्मी! अतां वधुवरां आशीर्वचा देउनी; ॥
दीर्घायुष्य, निरामया, उभयतां काया सदा लाभुनी, ।
भाग्यश्री विपुला निरंतर तयां लाभो खरी या जनीं! ॥८॥



[ प्रो. महामहोपाध्याय **ताह्मण** यांनीं मॉरिस कॉलेज मधून पेनशन घेतलें तेवेळीं म्हटलेलें. ]

# गुरुवर्य ताह्मण

दानांत दान वरदान असें कुणाचें ।
तें ज्ञानदान वदले बुध सद्‍गुरुचें ॥
आकर्षिती जलद वारि यथा जलार्थ ।
विद्या सुधी मिळवितात निवेदनार्थ ॥

तैसें कसें किति पचेल कळोनि द्यावें ।
कौशल्य यांत सगळें गुरुचें समावें ॥
आहे असा गुण गुरो! अपुल्या ठिकाणीं ।
सांगेल कोणिहि मना उघडें करोनी ॥

जाणार सोडुनि अह्मां सकलांसि आतां ।
येतें हृदीं भडभडोनि विचार येतां ॥
सार्थी-गभीर-रसपूर्ण-विनोद-वाणी ।
आतां पुन्हां कुठुनि ती पडणार कानीं ?॥

"स्वत्व त्यजूनि परसेवन अंधतेनें ।
नाशा स्वयें उमजुनी कवळोनि घेणें" ॥
ऐसा सदा शिकवणींत झरा वहाता ।
हेतू उदात्त धरुनी शिकवीत होतां ॥

श्रीशाररावरदहस्त शिरीं विराजे ।
श्रीचें ह्मणोनि रुसणें तिजला न साजे ॥
दुःखांतही उमजणें सुख ज्या कळालें ।
आदर्श ताह्मण असे सकलांस झाले ॥

( अकोला येथील देशसेविकांनीं नवरात्रोत्सव प्रसंगीं ह्मटलेलें. )

## —: दुर्गास्तवन :—

[ राग–सूप–ताल–त्रिताल ]

जय माहेश्वरि दुर्गमर्दिनी–जयरणचण्डी खड्गधारिणी ॥
दुर्मद दैत्यां रणिं संहारुनि
दुर्धर दारुण अघ निर्दाळुनि
त्रस्त आर्यभू मुक्त करोनी
गेली होउनि ती रणरागिणी ॥ जयरणचण्डी ॥

झाले, आहे, होणें जगतीं
नवतरुणांच्या निश्चित हातीं
वागवुनी हें अखण्ड चित्तीं
मिळवूं यश पौरुष आचरुनी ॥ जयरणचण्डी ॥.

स्वतंत्र करण्या भारतजननी
विजयादशमी मुहूर्त साधुनि
करुनि प्रतिज्ञा आजपासुनी
गाऊं अविरत दुर्गमर्दिनी ॥ जयरणचण्डी ॥

आर्यसंस्कृती विजयशालिनी
परम्परा अविरत पाळोनी
राहुं आर्यभू स्वर्ग करोनी
राष्ट्राचा संसार थाटुनी ॥ जयरणचण्डी ॥

———

[ आदर्श देशसेविका ]

# अभिनव माहिषासुरमार्दिनी

ही हादरीतभू आली अभिनव महिषासुरमर्दिनी ॥
कुंकुमसळवट भालीं चर्चुनि ।
रणवाक्तांडव अखण्ड गर्जुनि ।
नवभारततरुणां रणिं झुंझाया शौर्यें आव्हानी ॥

आपाद्मस्तक खादीवसनीं ।
नटुनी पदरां घट्ट कसोनी ॥
ही ध्वजा घेउनी पुढतीं चालें झुंझायास रणीं ॥

प्रसंग येवो कितिही दारुण ।
चमूस बोधी आत्मसंयमन ।
रणिं धैर्यें उसळलि धन्य चण्डिका अबलासेनानी ॥

काय भवानी छत्रपतीची ।
समरदेवता वा झांशीची ।
नवअवतारीं ध्वंसाया रिपु प्रगटे या भुवनीं ॥

रणचण्डी ही धैर्यशालिनी ।
शौर्यें ईप्सित घेइल साधुनि ।
मग जयजयकारें वितान हीच्या टाकूं भारोनी ॥

ग्रंथालय
४१९६

राजस्थान प्रिंटिंग अन्ड लीथोवर्क्स लि. अकोला

REFBK-0004496
REFBK-0004496